मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३७६६१/अपील क्रमांक ३५७७/०२

श्री.नर्मदाप्रसाद मिश्रा -----अपीलार्थी
प्राचार्य, राजीव गांधी मेमोरियल हायस्कूल,
नर्मदा-कृष्णा भवन, परेरावाडी, साकीनाका,
मुंबई - ४०० ०७२.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ- ९, हिल रोड,
वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०० ०५०.

२. सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०

---विवेचन---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १०/११/२००८
सुनावणीची तारीख २८/१/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री.नर्मदाप्रसाद मिश्रा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणेकामी दि.७/७/२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांचे फिर्यादी वरुन साकीनाका पोलीस ठाणेस दाखल गुरक्र.३३५/०७ कलम ४६५,४६७,४७१,४२०, ३४ भादवि या तपासाधिन गुन्हयाचे अर्जात नमूद मुद्देनिहाय कागदपत्रांच्या छायांकित प्रतींची मागणी केलेली होती. मात्र गुन्हा तात्कालीन कालावधीत तपासाधिन असल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (जे) अन्वये अपीलार्थी यांना गुन्हयाची कागदपत्रे नाकारण्यात आलेली होती.

त्यावर अपीलार्थी यांनी दि. २३/७/२००८ रोजीचे अर्जान्वये अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ९, मुंबई यांचे कार्यालयात अपील सादर केलेले होते. सदर अपीलाची सुनावणी अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात होवून, अपीलार्थी यांना माहिती नाकारण्यामागील कारण उचित असल्याने अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपीलार्थी यांचे अपील फेटाळले. तसा लेखी निर्णय आदेश जा.क्र. ११४२/पोउजा/परि ९ /माअअ/२००८ दिनांक २/८/२००८ अन्वये पारित करण्यात आला आहे.

सदर निर्णय आदेशास अनुसरुनच अपीलार्थी श्री.नर्मदाप्रसाद मिश्रा यांनी आयोगाकडे दि. १५/१०/२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले. आपल्या द्वितीय अपीलामध्ये देखिल ते दि. ७/७/२००८ रोजीच्या यापूर्वीच्या मुळ अर्जात मागणी केलेले गुरक्र.३३५/०७ या गुन्हयाचे सर्व कागदपत्रांची मागणी करीत आहेत.

माहिती न देण्याचे कारण सयुक्तिक आहे. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, नमूद गुन्हा हा "क" समरी मंजूरीस्तव महानगरदंडाधिकारी, २२ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांचे न्यायालयात मूळ कागदपत्रांसह सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे सद्यःस्थिती परिस्थिती ही अपीलार्थीस माहित झालेली आहे. न्यायालयाचे आदेश आता झाले असल्याचे अपीलार्थींनीच सांगितले, व त्यांना न्यायालयाने सुध्दा कांही प्रती दिलेल्या आहेत. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यास कांहीच हरकत नाही व त्या तशा १० दिवसात देण्यात याव्यात.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २१ मार्च, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३६६८९/अपील क्रमांक ३९३३/०२

श्री.संतोष महादेव चिकणे -----अपीलार्थी
१६०, गंगा निवास, कुंभारवाडा,
पन्नालाल घोष मार्ग, मालाड, मुंबई - ६४.

विरुध्द

१. सहायक आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/एन वार्ड,
मालाड (पश्चिम) मुंबई
२. सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/एन वार्ड,
मालाड (पश्चिम) मुंबई

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २७/११/२००८
सुनावणीची तारीख १९/३/२००९
अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी श्रीयुत जाधव यांनी त्यांच्या दि. ४/११/२००८ रोजीच्या आदेशामध्ये १५ दिवसांच्या आत माहिती द्यावी असे आदेश दिलेले होते. मात्र अपीलार्थीच्या अपीलमेमोप्रमाणे त्यांना ती माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या वेळेस विचारले असता अजूनपर्यंत सदरची माहिती देण्यांत आली नाही असेच दिसून आले.

जन माहिती अधिका-यांनी श्रीयुत चिकणे यांना त्यांच्या अर्जास अनुसरुन दि. १३ ऑक्टोबर, २००८ रोजी जे पत्र लिहिलेले आहे त्यावरुन अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयास बोलावले होते असे दिसते. मात्र या पत्रात अपीलार्थी त्यांच्या कार्यालयात आल्यास त्यांना हवी असलेली माहिती त्या कार्यालयात उपलब्ध असल्यास पुरविण्यात येईल असे लिहिलेले

आहे.   याचाच अर्थ असे पत्र पाठविण्याअगोदर  अपीलार्थीस हवी असणारी माहिती सर्वसाधारपणे तरी उपलब्ध आहे किंवा नाही याचा कुठचाहि शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही.   ही जन माहिती अधिका-यांची कृती योग्य नाही.

अपीलार्थींचा अर्ज येताच संबंधित प्रकरणातील नस्ती ही जन माहिती अधिका-यांनी स्वत: अभ्यासायची असते व आवश्यक तेथेच अपीलार्थींना चर्चेसाठी किंवा नस्तीची तपासणी देवून कागदपत्रे देण्यासाठी बोलवायचे असते.   जन माहिती अधिका-यांनी याबाबतीत कुठचाहि विचार न करता ठोकळेबाजपणे अपीलार्थीस उत्तर दिलेले दिसते. तसेच अपिलीय अधिका-यांच्या १५ दिवसांत माहिती देण्याच्या आदेशाचे सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी पालन केलेले दिसत नाही.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींना बोलावले होते पण ते आले नाहीत एवढेच जन माहिती अधिकारी सांगतात.   मात्र अपिलीय निर्णयाच्या आदेशाचे पालन का झाले नाही याबाबतचा खुलासा ते देवू शकले नाहीत.   त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २० अन्वये जन माहिती अधिकारी यांच्यावर रु ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.   ही शास्तीची रक्कम  महापालिका आयुक्त यांनी  १० मे, २००९ पर्यंत संबंधित जन माहिती अधिका-यांच्या पगारातून वसूल करुन शासनाच्या विहित लेखाशिर्षाखाली जमा करावा व तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस  ७ दिवसांच्या आत पाठवावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
सर्व संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.
या आदेशाची एक प्रत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनाही पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक.  २१ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३७७३७/अपील क्रमांक ४०५५/०२**

**श्री.मोहंमद उस्मान शेख -----अपीलार्थी**
**६/५३, अेन.सी.सी.गेट नं.७,९+**
**मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई -९५**

**विरुध्द**

**१. सहायक आयुक्त -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**१ ला मजला, लिबर्टी गार्डन, मालाड (प) मुंबई ६४.**
**२. जनमाहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**१ ला मजला, लिबर्टी गार्डन, मालाड (प) मुंबई ६४.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १/१/२००८**
**सुनावणीची तारीख १९/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी यांनी महापालिका कायदा कलम १६ -डी-१ अंतर्गत श्रीयुत असलम रमजान अली शेख- नगरसेवक वॉर्ड क्र ४३ यांनी निवडणूक लढवताना त्यांना अपात्र ठरविण्याबाबत कांही माहितीची मागणी केली होती.

त्यास जन माहिती अधिकारी यांनी सहायक अभियंता (इ.व.का.) पी/उत्तर यांनी महापालिका कायदा १६-डी त्या कार्यालयाच्या अखत्यारित येत नाही. मात्र त्यावरील अपीलात अपिलीय अधिकारी यांनी १६-डी-१ नगरसेवकास अपात्र ठरविण्याबाबत वरिष्ठ अधिका-यांसमवेत चर्चा करुन अपीलार्थीस त्याप्रमाणे कळविण्यात येईल असे

आदेशात नमूद केलेले आहे.  त्यामुळे अपीलार्थींना आता अशी चर्चा झाली किंवा कसे याबाबतची माहिती पाहिजे आहे.

मात्र अपीलार्थींनी सरळ आयोगाकडे अपील केलेले दिसते.  एरवी ही बाब अपिलीय अधिका-यांच्या निदर्शनाला आली असेल व ते त्या प्रथम अपीलाच्या वेळेला त्याचा खुलासा करु शकले असते.

अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३/११/२००८ रोजीच्या आदेशात हे आश्वासन अपीलार्थीस दिलेले आहे त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २३ मार्च, २००९                राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३७७१५/अपील क्रमांक ४०५४/०२**

**श्री.मोहंमद उस्मान शेख** **-----अपीलार्थी**
**६/५३, अेन.सी.सी.गेट नं.७,**
**मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई -९५**

**विरुध्द**

**१. सहायक आयुक्त** **-----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**१ ला मजला, लिबर्टी गार्डन, मालाड (प) मुंबई ६४.**
**२. जनमाहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग कार्यालय,**
**१ ला मजला, लिबर्टी गार्डन, मालाड (प) मुंबई ६४.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १/१/२००८**
**सुनावणीची तारीख १९/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींना माहिती देण्यांत आलेली आहे. पण त्यांचे समाधान झालेले दिसत नाही. त्यामुळे त्यांनी संबंधित कागदपत्रांचे अवलोकन करावे व त्यांना दिलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त आणखी काही कागदपत्रे पाहिजे असतील तर ते त्यांना देण्यांत यावेत.**

***----आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक. २३ मार्च, २००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३१२३६/अपील क्रमांक ४०६३/०२**

**श्री.सुखदेव सिंह मेहरा** -----**अपीलार्थी**
**पंजाबी वसाहत, इमारत क्र.८,**
**दुकान नं. ९२५, सायन कोळीवाडा,**
**जी.टी.बी. नगर, मुंबई - ३७**

**विरुध्द**

**१. जिल्हा उपनिबंधक** -----**उत्तरवादी**
**सहकारी संस्था, मुंबई (१)**
**मल्होत्रा हाउस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, मुंबई - ४०० ००१.**
**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक**
**सहकारी संस्था, एम-एन विभाग.**
**मल्होत्रा हाउस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ. समोर, मुंबई - ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ४/७/२००८**
**सुनावणीची तारीख १९/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलीय आदेशात अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही पंजाबी वसाहत, सायन कोळीवाडा मुंबई येथील नोंदणी केलेल्या संस्थेबाबत असून सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी अपीलार्थींना त्यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीकडून योग्य फी भरणा करुन घेवून अपीलार्थींना द्यावी. तसेच उपलब्ध नसल्यास माहिती संस्थास्तरावर उपलब्ध असल्यास संस्थेचे सचिव यांचेकडून प्राप्त करुन घेवून अपीलार्थींना द्यावी असे निर्देश दिलेले होते.**

त्याचप्रमाणे अपीलार्थींना साध्या प्रती देवू केल्या होत्या, पण अपीलार्थींनी सुनावणीच्या वेळेला त्यांना साक्षांकित प्रती पाहिजेत असे सांगितले. तेव्हा अपीलार्थींना साक्षांकित प्रत देण्याबाबत निर्देश देण्यांत आले.

सुनावणीअंती असे दिसून आले की, पृथ्वी पंजाब सह गृहनिर्माण संस्था व पृथ्वी पंजाब-२ सहकारी गृहनिर्माण संस्था या दोन्ही संस्थांच्या नोंदणीच्या मुळ धारिका जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयाच्या अभिलेख कक्षात उपलब्ध नाहीत. ५ दिवसांच्या आत या दोन्ही धारिकांचा कसोशिने शोध घ्यावा व अपीलार्थीस आवश्यक ती माहिती द्यावी. जर शोध घेवूनहि धारिका सापडत नसतील तर जिल्हा उपनिबंधक यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक यांच्या कार्यालयातून धारिका गहाळ होण्यास जे कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर विभागीय कारवाई करावी.

जर नस्त्या सापडूनच येत नसतील तर संस्थेकडून पुन्हा योग्य ते कागदपत्र प्राप्त करुन घेवून नस्ती रि-कन्स्ट्रक्ट करावी व अपीलार्थीस माहिती द्यावी. नस्ती नव्याने तयार करावयाची झाल्यास एक महिन्याच्या आत ती कार्यवाही पूर्ण करावी व अपीलार्थीस माहिती द्यावी.

---*आदेश*---

अपील मान्य करण्यात येत आहे.
वर दर्शविल्याप्रमाणे संबंधितांनी कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २३ मार्च, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३७७४९/अपील क्रमांक ४०६१/०२

श्री. शिवनारायण रामखेलावन राजभर -----अपीलार्थी
रामखेलावन राजभर चाळ, कृष्णा नगर,
मरोळ नाका, अे.के.रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ५९

विरुध्द

१. उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) -----उत्तरवादी
खो नं. ६५, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.
२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति/निष्का)
खो नं. ६५, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ९ जानेवारी, २००९
सुनावणीची तारीख १९/३/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस अंधेरी-कुर्ला रोड, मरोळ नाका येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे होत असलेल्या रस्तारुंदीकरणामुळे बाधीत झालेल्या नकाशा क्र२ उत्तर आय.डी.क्र. ९५, व ९५ अ च्या पत्राच्या पुराव्यादाखल एम.अे. जॉनी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केलेली होती.

अपीलार्थीस क्र ९५ अ येथील प्रकरणातील माहिती देण्यांत आली. मात्र ९५ या नस्तीचा शोध घेवूनहि मिळत नसल्यामुळे ज्याआधारावर पात्रता ठरविण्यांत आली उदा- शिधापत्रिका क्र.६२२२२१ दि. २५/४/९० , विद्युत क्र अे- १५७१०६ दि. २०/१२/८८ नुसार निवासासाठी पात्रता ठरविण्यात आली असून त्याबाबतचे परिशिष्ट-२ दि. ९/१२/२००५

**अन्वये एम.एम.आर.डी.ए. कडे पाठविण्यात आलेले आहे त्याची प्रत अपीलार्थीस देण्यांत आली. त्यामुळे मुळ नस्ती आढळून येत नसली तरी संबंधित माहिती देण्याचा कार्यालयाच्या जन माहिती अधिका-यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक. २३ मार्च, २००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३७७०२/अपील क्रमांक ४०६५/०२**

**श्री. चेतन कोठारी -----अपीलार्थी**
**५१, ओशियानिक अपार्टमेंट,**
**डॉ. राजबली पटेल लेन, बी. देसाई रोड,**
**मुंबई - ४०० ०२६.**

**विरुध्द**

**१. सह परिवहन आयुक्त -----उत्तरवादी**
**परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत,**
**३ रा व ४ था मजला, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**
**२. जन माहिती अधिकारी**
**परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत,**
**३ रा व ४ था मजला, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ८ जानेवारी, २००९**
**सुनावणीची तारीख २३/३/२००९**
**अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींना जी माहिती पाहिजे आहे ती देण्यासंबंधी परिवहन आयुक्त कार्यालयाने सर्व जिल्हा कार्यालयांना कळविले व आता फक्त ७ कार्यालयाकडून अपीलार्थींना माहिती मिळालेली नाही असे आयोगाच्या निदर्शनास आणले.**

**माहितीचा अधिकार अधिनियमात जर परिवहन आयुक्त कार्यालयाने त्यांच्या स्वतःच्या पध्दतीनुसार जी माहिती सर्व परिवहन कार्यालयांकडून गोळा करीत असेल ती**

**माहिती विचारली तर देणे बंधनकारक आहे. मात्र अपीलार्थींच्या गरजेनुसार सर्व परिवहन कार्यालयांकडून माहिती गोळा करुन अपीलार्थींना देणे हे बंधनकारक नाही.**

**असे जरी असले तरी आता फक्त ७ च कार्यालयांची माहिती अपीलार्थींना द्यावयाची राहिलेली आहे ती १०दिवसांत उपलब्ध करुन देण्यांत येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस सांगितले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक. २३ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ३५५/०७**

**श्री.एकबाल अहमद अ रज्जाक -----अपीलार्थी**
**कसाबवाडा मशिदीसमोर, मनपा दवाखाना शेजारी,**
**धुळे - ४२४ ००१.**

**विरुध्द**

**१. कार्यकारी अभियंता -----उत्तरवादी**
**राष्ट्रीय महामार्ग विभाग जळगांव,**
**जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जळगांव.**
**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (श्रेणी १)**
**राष्ट्री महामार्ग उपविभाग क्र. ४२, धुळे- ४२४ ००१.**

***---विवेचन---***

श्री. एकबाल अहमद अ रज्जाक यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. २९/९/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील केले आहे त्या अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी दि. २६/३/२००७ च्या अर्जान्वये श्री. अन्सारी रफिक अ मजीद यांच्या नियुक्तीचा दिनांक व पद व अन्य १२ मुद्दयांवर साक्षांकित माहितीच्या प्रती मागविल्या होत्या. अपीलार्थींनी ते दारिद्रय रेषेखालील असल्याचे नमूद करुन रेशन कार्डची प्रत सादर केल्याचे नमूद केले आहे. परंतू रेशन कार्डमधील कांही त्रुटीचा उल्लेख करुन त्यांची पूर्तता करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना दि. २९/३/२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. तद्नंतर दि. २१/५/२००७ रोजी अपीलार्थींनी प्रथम अपील केले. सदर अपीलाची सुनावणी दि. १३/६/२००७ रोजी घेवून अपीलार्थींच्या अर्जातील मुद्दयांनुसार मुद्देनिहाय उत्तरे / माहिती अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीस समक्ष

दिल्याचे नमूद करुन दि. २५/६/२००७ च्या आदेशान्वये अपील निकालात काढले. अपीलार्थीचे प्रथम अपीलाच्या आदेशावर समाधान न झाल्याने दि. २९/९/२००७ रोजी आयोगाकडे अपील केले. आयोगाकडील अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची बाजू समजून घेण्यांत आली. तसेच आयोगाकडील उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

जन माहिती अधिकारी यांनी, अपीलार्थीनी मागितलेली माहिती प्रमाणित करुन देण्याचे सुनावणीच्या वेळेस मान्य केले आहे. तेव्हा हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांत अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती प्रमाणित करुन जन माहिती अधिका-यांनी पुरवावी असे आदेश देण्यात येत आहेत. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २३ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३७७३२/अपील क्रमांक ४०७१/०२**

**श्री.खुर्शीद आलम सिध्दीक अली शेख -----अपीलार्थी**
**प्लॉट नं. २६/के/४६-४७ समोर (रोड नं. २)**
**शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई - ४०० ०४३.**

**विरुध्द**

**१. सह आयुक्त (सुधार) -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**विस्तार इमारत, ३ रा मजला/दुसरा मजला,**
**महापालिका मार्ग, फोर्ट , मुंबई - ४०० ००१**
**२.जन माहिती अधिकारी तथा चाचणी लेखा परीक्षा व दक्षिता अधिकारी रुम नं. २११**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**विस्तार इमारत, ३ रा मजला/दुसरा मजला,**
**महापालिका मार्ग, फोर्ट , मुंबई - ४०० ००१**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ३१/१२/२००८**
**सुनावणीची तारीख २३/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी त्यांना गोवंडी शिवाजी नगर येथील रफी नगर मुख्य नाल्याच्या रुंदीकरणामुळे त्यांचे झोपडे निष्कासित करुन त्यांची पर्यायी व्यवस्था न केल्याबद्दल अनेक अर्ज माहिती अधिकार अधिनियमांतर्गत दिलेले आहेत, व यासंदर्भात चाचणी लेखा परीक्षा व दक्षता अधिकारी यांचे कार्यालयात त्यांनी वेळोवेळी कागदपत्रे दिलेली आहेत. तसेच यासंदर्भातील संपूर्ण नस्ती अपीलार्थीस दाखविण्याची तयारी दर्शविलेली आहे व अपीलार्थीकडे सुध्दा यासंदर्भात चाचणी लेखा परीक्षा व दक्षता अधिकारी यांनी महापालिका**

आयुक्तांना सादर केलेली नोट व त्यांचे आदेश अशी सर्व माहिती आहे व यासंदर्भात त्यांना हव्या असणा-या कागदपत्रांची पाहणी करुन उपलब्ध कागदपत्रे ते केव्हाही घेवून जावू शकतात.

अशी जरी परिस्थिती असली तरी अपीलार्थींचे समाधान हे त्यांना प्रत्यक्षात सदनिका मिळावी अशी जी त्यांची मागणी आहे ती पूर्ण होईपर्यंत होईल असे दिसत नाही. त्यामुळे ते अनेक अर्जविनंत्या करीत राहतील असे दिसून येते.

महापालिका आयुक्तांनी दि. २६/११/२००७ रोजी पुढील निर्देश दिलेले होते.

"सहायक आयुक्त, एम/पूर्व यांनी रफी नगर नाल्यालगतच्या भूखंड क्र. २८ वर म्हाडाने वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत बांधलेल्या सदनिकापैकी अनधिकृतपणे बळकाविलेल्या /ताबा घेतलेल्या सदनिकामधून घुसखोरांना बाहेर काढल्यानंतर रिक्त झालेल्या या सदनिकांपैकी १ सदनिका श्री खुर्शीद आलम सिद्दिक अली शेख यांना देता येईल किंवा कसे याची चाचपणी करुन पुढील योग्य ती कार्यवाही करावी. "

यासंदर्भात कार्यवाही होवून काय निर्णय घेण्यांत आला त्याची माहिती अपीलार्थीस देण्यांत यावी असे निर्देश आता जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे. जर जन माहिती अधिकारी हे यासंदर्भातले अधिकारी नसतील तर त्यांनी आयोगाचे हे आदेश स्वत: संबंधित उप आयुक्त यांच्या निदर्शनास आणावेत व संबंधित उप आयुक्तांनी जे संबंधित अधिकारी असतील त्यांना ती माहिती अपीलार्थीस १० दिवसांचे आंत देण्याचे निर्देश द्यावेत व संबंधित उप आयुक्तांनी अपीलार्थीस ती माहिती १० दिवसांचे आंत पाठविली आहे याची खात्री करुन आयोगास तसा अहवाल पाठवावा.

***---आदेश---***

**अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.**

**सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक. २४ मार्च, २००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३६८३७/अपील क्रमांक ३८५८/०२**

**श्री.हरिश्चंद्र जोमा म्हात्रे -----अपीलार्थी**
**अ-५, गल्ली क्र ८, सेक्टर ९,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४**

**विरुध्द**

**१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी**
**परिमंडळ ३, मुंबई**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**प्रादेशिक विभाग नियंत्रण कक्ष,**
**बावळा कंपाउंड, डॉ.बी.ए.रोड, भायखळा, मुंबई**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २६ नोव्हेंबर,२००८**
**सुनावणीची तारीख २३/३/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी यांचा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम (३) अन्वये माहिती मिळविण्याकरीता दि. ३१/७/२००८ रोजीचा मुळ अर्ज दि. ७/८/२००८ रोजी जन माहिती अधिकारी कार्यालयास प्राप्त झाला होता. सदर मुळ अर्जामध्ये मागितलेली माहिती ही कुर्ला पोलीस ठाण्याचे कार्यालयाशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे जा.क्र. ७०६०/८६०/सपोआ /माहिती/मनिक/०९ दि. ७/८/२००८ अन्वये माहिती मिळविण्याकरीता तो अर्ज पाठविला होता. अपीलार्थी यांनी त्यांचे विरुध्द कुर्ला पोलीस ठाणे येथे नोंद असलेल्या गुन्हा रजि. क्र. ३१७/९९ कलम ३२३,५०४,५०६,(II) ११४ भादवि मध्ये अपीलार्थीना अटक करताना त्यावेळी सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी**

पोलीस निरीक्षक श्री. डवियरवाला यांचेकडे गुन्हयांच्या कागदपत्राच्या व दोषारोपपत्रांच्या प्रती दिल्या नसल्याचे नमूद करुन त्या संबंधातील सर्व अभिलेख पडताळणी करण्याची मागणी केली होती.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुर्ला पोलीस ठाणे यांचे कार्यालयीन जा.क्र. १११७९/तपास/०८ दि २३/८/०८ अन्वये जनमाहिती अधिकारी कार्यालयात अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती प्राप्त झाली होती. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले होते की, अपीलार्थी श्री. हरिश्चंद्र जोमा म्हात्रे यांना यापूर्वीच दि.६/१०/२००१ रोजी तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. डवियरवाला यांनी सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र संबंधित न्यायालयात सादर करताना अपीलार्थी हे या गुन्हयातील अटक आरोपी असल्याने त्यांना सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र व इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा संच देण्यात आला होता. सदर बाबत कागदपत्रांचा संच मिळाल्याबाबत अपीलार्थी आरोपीयांनी मुळ गुन्हयांच्या कागदपत्रांवर स्वतःची दिनांकि स्वाक्षरी केलेली आहे. तसेच गु.र.क्र.३१७/९९ या न्यायप्रविष्ठ गुन्हयाचे कागदपत्र ११ वे न्यायालय, कुर्ला मुंबई यांच्या अखत्यारित सदर गुन्हयासंबंधीचे कागदपत्र पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर उपलब्ध नाहीत, सबब सदर गुन्हया- संबंधीच्या कागदपत्रांची पडताळणी करता येणार नाही असे नमूद केले होते. तसेच सदरचा गुन्हा हा कलम १५६ (३)फौ.दं.प्र.सं. अन्वये संबंधित न्यायालयाकडून गुन्हा नोंदविण्याबाबतची साक्षांकित प्रत पोलीस ठाणेकडून प्राप्त झाली होती.

उपरोक्त प्राप्त माहिती ही अपीलार्थी यांना घेवून जाण्याबाबत दुरध्वनीवरुन दि. २५/८/२००८ रोजी कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलार्थी हे जन माहिती अधिकारी कार्यालयांत दि. ३०/८/२००८ रोजी स्वतः आले व त्यांना जन माहिती अधिकारी कार्यालयाचे जा.क्र. ७५८९/८६०/सपोआ/माहिती/०९ दि.३०/८/२००८ अन्वये शासनाचे शुल्क रु.६/- आकारुन पावती क्रमांक २२१८०५७, दि. ३०/८/२००८ वर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून देण्यात आलेली आहे.

परंतु जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती समाधानकारक नाही म्हणून अपीलार्थींनी दि.२४/९/२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,

परिमंडळ ३ कार्यालयात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १९(१)अन्वये प्रथम अपील दाखल केले होते. सदर अपीलाची सुनावणी दि. १३/१०/०८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांचे कार्यालयात झ ाली. सदर अपीलाचे सुनावणीवेळी अपीलार्थी यांनी कुर्ला पोलीस ठाण्यांकडून त्यांना गु.र.क्र.३१७/९९ मध्ये अटक करताना पोलीस निरीक्षक डवियरवाला यांनी दाखविलेल्या प्रती मागणी केली होती. सदर बाबतची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुर्ला पोलीस ठाणे यांच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थी यांना देण्याचे आदेश देवून अपील निकाली काढण्यात आले होते. सदर बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुर्ला पोलीस ठाणे यांचेकडून प्रथम अपीलाच्या अनुषंगाने प्राप्त माहिती जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र. ८६२८/८१/सपोआ/माहिती/मनिक/०८ दि. १५/१०/०८ अन्वये अपीलार्थी यांच्या रहाते निवासस्थानी युपीसी पोष्टाद्वारे पुरविण्यात आली.

सदर माहितीने अपीलार्थी यांचे समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर बाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुर्ला पोलीस ठाणे यांनी अभिलेखावरील जेवढी उपलब्ध माहिती आहे तेवढी अपीलार्थी यांना यापूर्वीच देण्यात आलेली आहे.

याबाबत कुर्ला पोलीस स्टेशन यांचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे ---

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे शासकीय माहिती अधिकारी तथा स.पो.आ.म.नि.क.यांच्याकडून पोष्टामार्फत प्राप्त झालेल्या माहितीसोबत कव्हरिंग लेटर दिले नसल्याचे तसेच अपीलार्थी यांना ज्या खाजगी तक्रारीच्या अनुषंगाने अटक केली त्या तक्रारी अर्जाची तसेच त्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या प्रतीची माहिती दिली नसल्याचे नमूद केले आहे.

अपीलार्थी यांनी प्रत्यक्ष मागणी केलेली माहिती उदा. मा.न्यायालयाने फौ.दं.प्र.सं कलम १५६(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याबाबत दिलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत, सहायक सरकारी अभियोक्ता, ११ वे न्यायालय यांनी दि. १६/१०/९९ रोजी अपीलार्थीस

अटक करण्यासंदर्भात दिलेल्या लेखी अभिप्रायाची प्रमाणित प्रत इ. माहिती मा.न्यायालयाच्या अखत्यारित असलेल्या कागदपत्रातुन अपीलार्थीस पुरविण्यात आली आहे.

यात्व्यतिरिक्त अपीलार्थी मागणी करीत असलेले कागदपत्रे ही कुर्ला पोलीस ठाणे गु.र.क्र. ३१७/९९, कलम ३२३, ५०४, ५०६,(२)११४ भादवि हया गुन्हयाशी संबंधित असून सदरचा खटला कोर्ट केस क्र. ७३/पी/२००० अन्वये मा.महानगर दंडाधिकारी, ५१ वे न्यायालय, कुर्ला यांच्या न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने खटल्याची कागदपत्रे न्यायालयाच्या अखत्यारित आहेत. न्यायालयातुन उपलब्ध झालेली व अपीलार्थी यांनी मागणी केलेली सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती अपीलार्थी यांना यापूर्वीच पुरविण्यात आल्या आहेत.

कुर्ला पोलीस ठाणे अभिलेखावर गु.र.क्र. ३१७/९९, कलम ३२३, ५०४,५०६(२), ११४ भादवि जी कागदपत्रे उपलब्ध झाली होती ती आणि न्यायालयातून प्राप्त कागदपत्रेही अपीलार्थी यांना मागणी केल्याप्रमाणे पुरविण्यात आली आहेत. त्यामुळे कुर्ला पोलीस ठाणेकडून अर्धवट माहिती दिली असे म्हणणे योग्य नाही.

सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचा अपीलमेमो लक्षात घेतला. जन माहिती अधिकारी व संबंधित पोलीस स्टेशन यांचा अहवाल पाहता अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असेच आयोगाचे मत झालेले आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २४ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८२२६/अपील क्रमांक ४०७५/०२**

**श्री.विशाल रामदास भोगे -----अपीलार्थी**
**रुम नं. ३०६, बि.नं. १०१, न्यू म्हाडा कॉलनी,**
**डॉ.आंबेडकर नगर, मानखुर्द, मुंबई - ४०० ०४३.**

**विरुध्द**

**१. सह मुख्य अधिकारी -----उत्तरवादी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१**
**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**(घाटकोपर विभाग)**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २३ जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख २३/३/२००९**
**अपीलार्थी उपस्थित जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थींना त्यांनी केलेल्या अर्जामध्ये मुंबई मंडळाच्या जुन्या इमारतीच्या अनुलग्न जागेमधील असलेल्या झोपडयांना तसेच ज्या झोपडया स्लम म्हणून घोषित नाही अशा झोपडयांना फोटोपास देणे नियमात बसत नसतांना सुध्दा श्रीयुत ॲन्थनी सॅबेस्टीयन यांना फोटोपास दिला असून त्यासाठी कोणते निकष लावण्यांत आले याबाबतची माहिती मागितली होती.**

**अपीलार्थी यांनी जन माहिती अधिका-यांकडे दि. १६/७/२००८ रोजीच्या अर्जाने माहितीची मागणी केली होती. त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. ६/८/२००८**

रोजीच्या पत्राने शासन क्रमांक ग.व.सु.१२२० प्र.क्र.२०४(१)/झो.प.सु-१ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ या परिपत्रकाप्रमाणे फोटोपास देण्यात आला आहे असे कळविले.

अपिलीय निर्णयात माहिती दिली असल्यामुळे अपील निकाली काढले.

सुनावणीच्या वेळेस आयोगास असे दिसून आले की, रेकॉर्डप्रमाणे असलेली माहिती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. मात्र त्यातील निर्णय हा जर अपीलार्थीस मान्य नसेल तर त्यांनी फोटोपास देण्यात येतात त्या कायद्याखालील अपिलीय प्राधिका-यांकडे अपील करुन आपल्या तक्रारीची तड लावून घेणे जास्त श्रेयस्कर ठरेल.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २४ मार्च, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८२२२/अपील क्रमांक ४०७४/०२**

**श्री.नामदेव गंगाराम ढोकळे -----अपीलार्थी**
**गीतानगर, खो.क्र. १९३ (वेस्ट), नेव्ही नगर,**
**कुलाबा, मुंबई - ४०० ००५.**

**विरुध्द**

**१. पोलीस उपमहानिरीक्षक (का.व.सु) -----उत्तरवादी**
**पोलीस महासंचालक कार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.**
**२.जन माहिती अधिकारी तथा उप सहायक (गुन्हे)**
**पोलीस महासंचालक कार्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २८ जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख २३/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींना त्यांचे खेडयातील आई-वडिल राहत असलेल्या घरावर जो दरोडा पडला त्यासंदर्भातील कारवाईच्या संबंधी माहिती पाहिजे होती. याबाबत झलेल्या चौकशीत तसेच शोध घेण्यात कसुर करणा-या अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द केलेल्या कारवाईची सुध्दा मागिती मागितली आहे.**

**तसेच अपीलार्थी यांनी मानवी हक्क आयोगाकडे केलेल्या अर्जानुसार स्थानिक पोलीस तपास सि.आय.डी कडे सुध्दा देण्यात आलेला होता पण त्यात सुध्दा आरोपींना पकडण्याच्या दृष्टीने अजूनपर्यंत निष्पन्न झालेले नाही. त्यामुळे न्यायदंडाधिका-यांनी अ**

समरी मंजूर केली असून सदरचा गुन्हा कायम तपासावर आहे.

अपीलार्थींना कागदोपत्री जी माहिती पाहिजे ती दिलेली आहे असेच सुनावणीअंती आयोगाचे मत झालेले आहे. मात्र अपीलार्थींचे समाधान हे आरोपी पकडला जावून व त्यांच्या वडिलांच्या घरातून लंपास केलेला ऐवज मिळण्यानेच होणार आहे व त्यासाठी ते वेगवेगळया प्रकारे प्रयत्न करीत आहेत असेच दिसून येते.

माहितीचा अधिकार अधिनियमात रेकॉर्डला असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे हे येते. व त्यानुसार संपूर्ण माहिती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. गुन्हयातील चौकशीबाबत अपीलार्थी यांच्याबाबत संपूर्ण सहानुभूती असूनहि माहितीचा अधिकार अधिनियमात फारसे कांही करता येईल असे वाटत नाही ही परिस्थिती मान्य करावीच लागेल. पोलीसही त्याबाबत चौकशी जारी ठेवतील व आरोपींना पकडण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहतील असेच जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २४ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३७६९७/अपील क्रमांक ४०८३/०२**

**श्री. दलजितसिंग चौहान -----अपीलार्थी**
**अ-१०३, गुरुदर्शन सी.एच.एस.लि.**
**प्लॉट नं. ७, अंधेरी (पश्चिम) मुंबई - ५३.**

**विरुध्द**

**१. उप सचिव -----उत्तरवादी**
**शालेय शिक्षण , क्रिडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**शालेय शिक्षण , क्रिडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ९ जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख २४/३/२००९**
**अपीलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**श्रीयुत दलजितसिंग चौहान, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मुंबई हॉकी असोसिएशन लिमिटेड या संस्थेशी संबंधित वित्तीय वर्षाबाबत व अन्य महत्वाच्या प्रश्नांबाबत दिनांक २२ ऑगस्ट, २००८ च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. तथापि, सदर माहिती मुंबई हॉकी असोसिएशन लिमिटेड या संस्थेशी संबंधित असल्यामुळे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(३) अनुसार त्यांचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी मानद सचिव, मुंबई हॉकी असोसिएशन लिमिटेड, महिंद्र स्टेडियम, "डी" रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० यांच्याकडे दि. २८ ऑगस्ट, २००८ च्या शासन पत्रान्वये पाठविण्यात आला असून, आवश्यक ती माहिती श्री. चौहान यांना उपलब्ध करुन**

देण्याबाबत त्यांना सूचित करण्यात आले होते व तसे श्री.चौहान यांना कळविण्यात आलेले आहे.

माहिती न मिळाल्यामुळे अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा संस्थेला ही माहिती देण्यासंबंधी कळविलेले आहे. मात्र अपीलार्थी यांना अजूनहि माहिती मिळालेली नाही.

अपीलार्थी हे सुध्दा मुंबई हॉकी असोसिएशन लिमिटेड या संस्थेचे सदस्य आहेत. अपीलार्थीच्या अर्जाचे वाचन केले असता अनेक लहान सहान मुद्दयांवर सुध्दा माहिती मागितलेली दिसते, व मुद्दयांची एकूण संख्या ही २० च्या वर आहे.

संस्थेने अपीलार्थींना असेहि सुचविले आले की, त्यांच्या ब-याच प्रश्नांची उत्तरे ही त्यांना ॲन्युअल रिपोर्ट मध्ये सुध्दा मिळू शकतात, व उर्वरित मुद्दे त्यांनी नमूद केल्यास त्यांना ती माहिती देता येवू शकेल.

सुनावणीच्या वेळेस माहितीच्या अधिकारामधील त्यांनी दिलेल्या अर्जातील ज्या मुद्दयांची माहिती अपीलार्थीस आता खरोखरच आवश्यक वाटते असे मुद्दे अपीलार्थी हे उप सचिव तथा अपिलीय अधिकारी यांच्याकडे देतील व उप सचिव तथा अपिलीय अधिकारी यांनी १० दिवसांच्या आंत अपीलार्थीस माहिती देण्याचे निर्देश मुंबई हॉकी असोसिएशनचे जन माहिती अधिकारी यांना द्यावेत. तसेच ही माहिती दिली किंवा नाही हे पडताळून पाहण्यासाठी अपिलीय अधिकारी तथा उप सचिव यांनी संस्थेचे जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी यांना एका विवक्षित दिवशी त्यांच्या कार्यालयात बोलवावे व ही माहिती अपीलार्थींना दिली किंवा नाही याची खातरजामा करुन घ्यावी व तसा अहवाल आयोगास पाठवावा. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २४ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८१९०/अपील क्रमांक ४०८८/०२**

**श्री.नितीन टी गवाणकर -----अपीलार्थी**
**०५, गवाणकर निवास, साईकृपा इमारतीसमोर,**
**दहिसर (पूर्व) मुंबई - ४०० ०६८.**

**विरुध्द**

**१. उप आयुक्त (विशेष) -----उत्तरवादी**
**उप आयुक्त (विशेष) यांचे कार्यालय,**
**भाभा हॉस्पीटल इमारत, १ ला मजला,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, रा.कृ.पाटकर मार्ग,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.**
**२.जन माहिती अधिकारी**
**उप आयुक्त (विशेष) यांचे कार्यालय,**
**भाभा हॉस्पीटल इमारत, १ ला मजला,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, रा.कृ.पाटकर मार्ग,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २१ जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख २४/३/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

श्रीयुत नितीन गवाणकर यांना कांही टेलिफोनिक कंन्प्लेंटसची उप आयुक्त (विशेष) कार्यालयाकडे काय कारवाई करण्यात आली यासंबंधीची माहिती पाहिजे होती. या तक्रारी संबंधित आर/नॉर्थ विभाग यांच्याकडे पाठविण्यात आल्या. तसे अपीलार्थीस कळविण्यांत आले. त्याने समाधान न झाल्यामुळे मुळ जन माहिती अधिका-यांच्याच अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल करण्यांत आले व त्या अपिलीय अधिका-यांनी

वस्तुस्थितीची माहिती देण्यांत आलेली आहे असे नमूद करुन अपील निकाली काढले. त्याविरुध्द हे सदरचे अपील आहे.

वास्तविक पाहता अपीलार्थीस त्यांच्या तक्रारी या सहायक आयुक्त आर/नॉर्थ विभागाकडे पाठविल्यामुळे व अपीलार्थीचा अर्ज हा आर/नॉर्थ विभागाकडे आल्यामुळे त्याला उत्तर देण्याची जबाबदारी ही आर/नॉर्थ विभागाची आहे. त्यामुळे अपीलार्थीस हवी असणारी माहिती जन माहिती अधिकारी आर/नॉर्थ विभागाने देणे आवश्यक होते.

हे आदेश मिळाल्यापासून अपीलार्थीस १० दिवसांचे आत माहिती द्यावी. तसेच सहाय्यक आयुक्त (RE)(W.S.)I/C यांनी अपीलार्थीचा तक्रार अर्ज त्यांच्याकडे दि. ५/१२/२००८ रोजी पाठविला होता तर अपीलार्थीस मुदतीत माहिती का दिली नाही याचा खुलासा आर/नॉर्थ विभागाच्या संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

सदरील आदेशाची प्रत सहायक आयुक्त आर/नॉर्थ यांना देण्यात यावी व त्यांनी हे आदेश संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे अनुपालनास्तव पाठवावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २५ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३४४८५/अपील क्रमांक ४१६०/०२**

**श्री.महेंद्र जनार्दन चव्हाण -----अपीलार्थी**
**८५/२, चाळके चाळ, ताडवाडी,**
**स्वदेशी मिल, सायन, चुनाभट्टी ,मुंबई - २२**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२**
**२.जन माहिती अधिकारी**
**नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ४ सप्टेंबर, २००८**
**सुनावणीची तारीख २४/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींच्या अनेक अपीलांच्या संदर्भात आयोगाने वेळोवेळी त्यांना असे निर्देश दिलेले आहेत की, त्यांच्या अपीलाची भाषा ही अतिशय क्लिष्ट असते, तेव्हा त्यांनी साध्या, सोप्या भाषेत अपील/अर्ज करावेत. मात्र अजूनहि अपीलार्थी या निर्देशाचे पालन करीत असल्याचे दिसून येत नाही याबद्दल त्यांना समज देण्यांत आली.**

**अपीलार्थींना माहिती न मिळण्याचे प्रमुख कारण साध्या, सरळ सोप्या भाषेत अर्ज न करणे हेच आहे.**

अपीलार्थींना काय माहिती पाहिजे असे विचारले असता सुप्रिम कोर्टाच्या आदेशानंतर महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या आदेशानुसार मंत्रालयीन विभागात झालेल्या रिक्रूटमेंटसंबंधीची माहिती त्यांना पाहिजे असे निष्पन्न झाले. ही माहिती अपीलार्थीस १५ दिवसांच्या आत देण्याचे निर्देश देण्यांत आले.

अपीलार्थींचा मुळ अर्ज हा नगर विकास विभागाच्या अधिनस्त कार्यालयांकडे सुध्दा पाठविण्यांत आलेला आहे व ती स्वतंत्र जन प्राधिकरणे आहेत असे सांगण्यांत आले. ही जनप्राधिकरणे स्वतंत्र असल्यामुळे अपीलार्थींनी त्यांना स्वतंत्रपणे अर्ज देणे आवश्यक होते. असे जरी असले तरी विभागाने अपीलार्थींच्या अर्जाच्या प्रती त्यांना पाठविल्या तर विभागाने त्या जन माहिती प्राधिकरणाला सुध्दा विभागाचे पत्र मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत माहिती देण्याचे निर्देश द्यावेत.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

मात्र अपीलार्थींनी यापुढे क्लिष्ट भाषेत अर्ज /अपील करण्याचे सुरुच ठेवले तर आयोगास त्यांच्या अपील/ अर्जा बाबत वेगळी भूमिका स्वीकारणे अनिवार्य होईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २५ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३८१९३/अपील क्रमांक ४०८६/०२

श्री.राजेश  शामराव सोनावणे -----अपीलार्थी
४३५/२२, जयराज भूवन, न्यू मिल रोड,
कुर्ला (पश्चिम) मुंबई - ४०० ०७०

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ - ३ , मुंबई.
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, बावळा कंपाउंड,
भायखळा, मुंबई .

---*विवेचन*---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ३ फेब्रूवारी,२००९
सुनावणीची तारीख २४/३/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी यांचा मुळ अर्ज व त्यास दिलेली माहिती ही पुढील प्रमाणे -

| मुद्दा क्र | विषय | शेरा |
|---|---|---|
| १ | उप मुख्यमंत्री कार्यालयात नोंदणी केलेले दि. ०८/०२/०८ वे क्रमांक विमा/१०७३ चे पोलीस उप आयुक्त परिमंडळ-४ मुंबई यांचेकडे मी स्वत: हस्तपोच केलेले दि.८/२/०८ क्र.डीजेएमएस/उमुस/विमा/१०७३/०८ च्या पत्राबाबत माहिती देण्यात यावी | अर्जदार यांच्या ८/२/०८ क्र.डीजेएमएस/उमुस/विमा/ १०७३/ ०८च्या पत्राबाबत भोईवाडा पोलीस ठाणे यांनी चौकशी केली असता सदरची बाब ही दिवाणी स्वरुपाची असून ती शिक्षण विभागाशी संबंधित असल्याने मा.शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई यांना भोईवाडा पोलीस ठाणे यांनी त्यांचे जावक पत्र क्र.९१४६/०८ दि.१५/७/०८ अन्वये चौकशी करुन |

| | | |
|---|---|---|
| | | कारवाई करण्याबाबत कळविले आहे. |
| २ | भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून उपरोक्त क्र.२ मध्ये नोंद असलेल्या पत्रासंदर्भातील अहवाल आलेला असल्यास त्याची माहिती देण्यात यावी. सदर अहवालाची प्रत मिळावी. | प्राप्त अहवालाची छायांकित प्रत जोडण्यात येत आहे. |

दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलीय अधिका-यांकडे केलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयात दिलेली माहिती वस्तुस्थितीप्रमाणे व कागदपत्रांनुसार योग्यच आहे असा निर्वाळा देवून प्रथम अपील निकाली काढले त्या निकालाविरुध्दचे हे द्वितीय अपील आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमानुसार जसा अभिलेख असेल तो अभिलेख जशाच्या तसा माहितीच्या स्वरुपात अपीलार्थीस पुरविण्यात येतो. त्यामुळे जर पोलीस विभागाने सदरील केस ही दिवाणी स्वरुपाची आहे व त्याबाबत शिक्षण विभागानेच चौकशी करावी असे कळविले असेल तर ती माहिती ही दिलेली माहिती ही रेकॉर्डप्रमाणे बरहुकुम दिलेली आहे असे समजण्यचात येते.

अपीलार्थीची मुळ मागणी ही पोलीस विभागाने चौकशी करावी असे दिसते व पोलीस विभागाचे म्हणणे ही दिवाणी स्वरुपाची बाब असल्यामुळे शिक्षण विभागानेच याबाबत चौकशी करावी हे आहे. ही परिस्थिती अपीलार्थीस अवगत करुन दिलेली असल्यामुळे माहिती देण्याबाबत कसुर झालेला दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २५ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८१९१/अपील क्रमांक ४०८७/०२**

**श्री.जगदिश देवराम टोरपे -----अपीलार्थी**
**४५ अ, टोरपे हाउस, १ ला मजला,**
**तेजपाल स्कीम, ५ वा रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७**

**विरुध्द**

**१. सहाय्यक मनपा आयुक्त -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**के/पूर्व विभाग, आझाद रोड, गुंदवली,**
**अंधेरी (पूर्व) मुंबई - ४०० ०६९**
**२.जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता**
**सहाय्यक मनपा आयुक्त कार्यालय,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**के/पूर्व विभाग, आझाद रोड, गुंदवली,**
**अंधेरी (पूर्व) मुंबई - ४०० ०६९.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २४ जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख २४/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**सदरील अपीलाचा विषय अपीलार्थींनी महापालिका आयुक्त यांना दि.४/९/२००८ रोजी जे पत्र लिहिले होते त्या पत्रावर केलेल्या कारवाईसंबंधीची माहिती हा आहे. अंतिमतः अपीलार्थीस दि.२९/११/२००८ रोजीच्या पत्राने पुढीलप्रमाणे उत्तर देण्यांत आलेले आहे.**

**" उपायुक्त (विशेष अभियांत्रिकी ) यांनी क्र. उपआ/वि.अ./२३६९ दि. ९/१०/०७ द्वारे**

असे आदेश देण्यात आले होते की, मे.बॉम्बे डाईंग व मॅन्युफॅक्चरिंग कंपनीच्या वादग्रस्त जलदेयकाच्या कालावधीतील कंपनीची विद्युत देयके/ कार्यरत कामगारांची संख्या/ तयार होत असलेल्या मालाची माहिती इत्यादी माहिती कंपनीकडून मागवावी. व जलदेयकांचे वाद प्रचलित नियमांनुसार मिटविण्यात यावे. त्यानुसार कंपनीला पत्र लिहून माहिती मागविण्यात आली होती.

संपूर्ण प्रकरणाची सक्षम अधिका-यांकडून छाननी करण्यात आली व सदर जलदेयकाचा वाद असमर्थनिय असल्याचे आढळून आले. सदर बाब कंपनीला सुचित करण्यात आली आहे. "

त्यामुळे रेकॉर्ड प्रमाणे अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे असे दिसून येते. अपीलार्थींना यासंदर्भातल्या मुळ नस्तीची पाहणी करायची असल्यास ते निश्चितपणे करु शकतात. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २५ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३४४७०/अपील क्रमांक ३८५३/०२**

**श्री.जनार्दन मारुती शिंदे -----अपीलार्थी**
**आजाद गल्ली, गौरीशंकर चाळ, रुम नं.८,**
**सायन चुनाभट्टी, मुंबई - ४०० ०२२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त -----उत्तरवादी**
**एल वार्ड, लक्ष्मणराव यादवराव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व.का)**
**एल वार्ड, लक्ष्मणराव यादवराव मंडई इमारत,**
**स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०**

***---विवेचन---***

वरील अपीलाच्या निर्णयात अपिलीय अधिकारी यांनी दि ८/२/२००८ रोजीच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती द्यावी असे निर्देश देण्यांत आले होते. मात्र १ वर्ष लोटून गेले तरी अपिलीय अधिका-यांच्या आदेशाचे पालन न झाल्याने आयोगाने दि. ११ फेब्रूवारी, २००९ रोजीच्या आदेशात अपीलार्थीस माहिती देण्यांत यावी व जन माहिती अधिका-यांविरुध्द शास्तीची कारवाई का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिलेला खुलासा पुढीलप्रमाणे आहे.-

" श्री. जनार्दन मारुती शिंदे यांनी विचारलेली माहिती संकलित स्वरुपात नसल्याने व तसेच यादरम्यान कार्यालयातील त्या प्रभागातील क्षेत्रिय अधिकारी नोकरी सोडून गेल्यामुळे त्याजागी अधिका-यांची अदलाबदलाची प्रक्रिया सुरु होती व नविन नियुक्त अधिका-याला

त्या प्रभागाच्या कामकाजाची समरुप होईपर्यंत संबंधित माहिती पुरविणे हे शक्य झाले नाही. यास्तव सदर माहिती शोधून संग्रहीत करण्यात आली व अर्जदाराला त्याबाबत उत्तर देण्यात आले. यासंदर्भात अर्जदारास उत्तर देण्यास विलंब झाला याबाबत क्षमा करावी व यापुढे यासंबंधी योग्य ती काळजी घेण्यात येईल. "

जरी यातली कारणमिमांसा थोडीबहूत पटण्यासारखी असली तरी १ वर्षभर माहिती दिलेली नाही ही बाब सयुक्तिक होवू शकत नाही. तथापि, वरील मुद्दयाचाही विचार करुन संपूर्ण शास्ती न लावता माहिती देण्याच्या विलंबासाठी २० दिवसांसाठी रक्कम रु. २५०x२०=५,०००/- (रुपचे पांच हजार) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर शास्तीची रक्कम संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या पगारातून १० मे, २००९ पूर्वी वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा अनुपालन अहवाल महापालिका आयुक्त यांनी आयोगास सादर करावा.

***--- आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यांत येत आहे.

सदर आदेशाची एक प्रत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनाहि पाठविण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २५ मार्च, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८१८०/अपील क्रमांक ४०९३/०२**

**श्री. प्रद्योत गोविंद नवाथे -----अपीलार्थी**
**राजबाग, ब्लॉक नं. २०५, दौलचंद सी.एच.एस.लि.**
**भालचंद्र रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९**

**विरुध्द**

**१. उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव) -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वार्ड कार्यालय,**
**भायखळा (पश्चिम) मुंबई - ४०० ००८.**
**२.जन माहिती अधिकारी**
**उपमुख्य अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वार्ड कार्यालय,**
**भायखळा (पश्चिम) मुंबई - ४०० ००८.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २० जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख २५/३/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी सदरील इमारतीबाबत याआधीही अनेक अर्ज केलेले आहेत व त्यांना माहितीहि दिलेली आहे. तसेच अपीलार्थीनी नस्तीची तपासणी सुध्दा केलेली आहे.**

**माहितीचा अधिकार अधिनियमान्वये माहिती मागण्याचे स्वरुप हे प्रश्न असूच शकत नाहीत असे नाही. मात्र त्या प्रश्नाची उत्तरे जर कागदपत्रांत उपलब्ध असतील तर त्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी अपीलार्थीस देवू शकतो म्हणजे अपीलार्थीस पुन्हा पुन्हा अर्ज करण्याची गरज पडू नये. वाटल्यास अपीलार्थीनी संबंधित नस्तीची पुन्हा पाहणी करावी व त्या पाहणीच्या वेळेला संबंधित अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या प्रश्नांची**

उत्तरे हुडकून काढण्यास मदत करावी व त्याना जी कागदपत्रे पाहिजे असतील त्या प्रती त्यांना देण्यांत याव्यात. म्हणजेच अपीलार्थींच्या माहितीची एकाच वेळी संपूर्ण गरज भागविल्या जावू शकेल. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्टाप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २५ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८१७९/अपील क्रमांक ४०९२/०२**

**श्रीमती रजनी मेनेजेस** **-----अपीलार्थी**
**Prop.FAVOURITES**
**शॉप नं. ६, सोनवाडी मेन्शन,**
**२०९, एल.जे. रोड, टायकलवाडी,**
**माहिम, मुंबई - ४०० ०१६.**

**विरुध्द**

**१. सहायक मनपा आयुक्त** **-----उत्तरवादी**
**जी/ नॉर्थ वॉर्ड कार्यालय, हरिश्चंद्र येवले मार्ग,**
**दादर (पश्चिम) मुंबई - २८**
**२.जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी**
**जी/ नॉर्थ वॉर्ड कार्यालय, हरिश्चंद्र येवले मार्ग,**
**दादर (पश्चिम) मुंबई - २८**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २० जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख २५/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींना त्यांनी नमूद केलेल्या प्रकरणातील श्री. देवराज लालजी गोसर यांनी फर्स्ट हेल्थ लायसन्स नं. ७६१४०८३०४ मिळण्यासाठी जी कागदपत्रे सादर केली होती त्याच्या प्रती पाहिजे आहेत.

सध्या असलेल्या लायसन्सच्या प्रती उपलब्ध आहेत. मात्र मुळ अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते कागदपत्र जुनी असल्यामुळे उपलब्ध होत नाहीत असे अपीलार्थीस कळविण्यांत आले होते असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस केलेले आहे.

कागदपत्रे जुनी आहेत हा मोघम दावा असतो. रेकॉर्ड मॅनेजमेंटच्या दृष्टीकोनातून जी कागदपत्रे किती वर्षासाठी जतन करुन ठेवायची असतात हा मुख्य मुद्दा आहे. ज्या कालावधीसाठी जी कागदपत्रे जतन करुन ठेवायची असतात त्या कालावधीसाठी ते कागदपत्र असायलाच पाहिजे. तेव्हा अपीलार्थीना जी कागदपत्रे हवी आहेत त्या कागदपत्रांचा पुन्हा शोध घ्यावा व अपीलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही करावी असे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २५ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ३४८/०२**

**श्री.पुंडलिक देवराम वारके -----अपीलार्थी**
**मु.पो. सावदा (काझीपुरा) ता. रावेर,**
**जिल्हा जळगांव.**

**विरुध्द**

**१. जिल्हा उपनिबंधक -----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, जळगांव.**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक**
**सहकारी संस्था रावेर, जि.जळगांव.**

***---विवेचन---***

**श्री.पुंडलिक देवराम वारके यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. ७/९/२००७ रोजी जे द्वितीय अपील केले आहे त्या अपीलाची सुनावणी दि. ३/३/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेस अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी दि. २२/५/२००७ च्या अर्जान्वये माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत दि.२२/२/२००७ च्या अर्जाची नक्कल व दि. २२/२/२००७ च्या अर्जाचे अवलोकन केल्याची तारीख मिळविण्याची मागणी केली होती. सदर अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी दि. २१/६/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थीना पुरविल्याचे निदर्शनास येते.**

**अपूर्ण माहिती दिली. माहिती देण्यास कसूर केली असे नमूद करुन दि. १०/७/२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलाची दि. २६/७/२००७ व दि.३१/७/२००७ रोजी सुनावणी आयोजित केली होती. दि. २६/७/२००७ च्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणी नंतर दि.**

१४/८/२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केले असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. २१/६/२००७ रोजी माहिती पुरविल्याचे तसेच सदर दि. २२/२/२००७ चा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जिल्हा उपनिबंधकांच्या दि. ५/३/२००७ च्या पत्रान्वये प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे.

अपूर्ण माहिती दिली व दोन रुपयाचा जन माहिती अधिकारी यांनी अपहार केल्याचे नमूद करुन आयोगाकडे दि. ७/९/२००७ रोजी अपील केले.

आयोगाकडील अपीलाची सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची बाजू समजून घेण्यात आली. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी केली असता अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित वेळेत दिल्याचे निदर्शनास येते. असे असले तरी अपीलार्थींनी माहितीसाठी जमा केलेल्या रु.४/- एवढया रकमेपैकी जर रु.२/- एवढया रकमेपुरती माहिती पुरविली असल्यास उर्वरित रु.२/- अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी त्वरित परत करावेत. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २६ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ३७२/०२**

**श्री. दयालदास सिताराम गवळी -----अपीलार्थी**
**विटाभट्टी , देवपूर, धुळे- ४०२ ००५**

**विरुध्द**

**१. जिल्हा पुरवठा अधिकारी -----उत्तरवादी**
**धुळे .**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा**
**पुरवठा अधिकारी, धुळे.**

***---विवेचन---***

**श्री. दयालदास सिताराम गवळी यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. १/११/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील सादर केले आहे त्याची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी दि. ८/८/२००७ च्या अर्जान्वये रॉकेल परवानाधारक मयताचे वारसांना विशेष बाब म्हणून परवाने दिलेत त्याची दि. ३१/३/२००० ते ३१/३/२००७ या कालावधीतील माहिती मागविली होती. परंतु सदर माहिती मिळाली नाही असे नमूद करुन दि. १३/९/२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु अपीलाच्या अनुषंगानेही माहिती मुदतीत मिळाली नाही असे नमूद करुन दि. १/११/२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले.**

**आयोगाकडील अपीलाची सुनावणी घेतली त्यावेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती उपलब्ध केल्याचे नमूद केले आहे. तसेच माहिती उपलब्ध झाल्याचे अपीलार्थी यांनी नमूद केले. तसेच आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलावर कांही कार्यवाही केली नसल्याचे दिसून**

**येते.  यापुढे विहित वेळेत अपीलावर सुनावणी घेवून निर्णय देण्याची दक्षता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घ्यावी.  त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***---आदेश---***

**अपील  निकाली काढण्यात येत आहे.**

**माहिती देण्यात  २ दिवसांचा उशीर झाला आहे.  असे होवू नये याची जन माहिती अधिकारी यांनी खबरदारी घ्यावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक.  २६ मार्च, २००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ३५४/०७**

**श्री. सुरेश सखाराम पाटील -----अपीलार्थी**
**मु.पो. मुकटी, ता.जि. धुळे (राम मंदिरच्या मागे मुकटी)**

**विरुध्द**

**१. विशेष समाज कल्याण अधिकारी -----उत्तरवादी**
**जळगांव.**
**२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**माध्यमिक आश्रमशाळा वसंतनगर,**
**जि. जळगांव.**

***---विवेचन---***

श्री.सुरेश सखाराम पाटील यांनी आरैगांबाद खंडपीठाकडे दि. २६/१०/२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. सदर अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी दि. ३/९/२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन अपीलार्थीच्या वेतनातून दरमहा रु. १००/- प्रमाणे माहे ऑगस्ट २००५ ते मार्च २००६ या कालावधीत कपात केलेली आर.डी. ची रक्कम प्रत्येक महिन्याच्या कोणत्या तारखेला जमा केली इ. माहिती मागविली होती. परंतु आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसते की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीचा अर्ज स्वीकारण्याचे नाकारल्याने दि. २०/९/२००७ रोजी अपीलार्थींनी प्रथम अपील केले. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ९/१०/२००७ च्या पत्रान्वये माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे. अपीलार्थींनी अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश/ निर्णय मिळाला नसल्याचे नमूद करुन आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलार्थींनी माहिती मिळण्यासाठी तसेच विलंबाबाबत दंडात्मक कारवाई करणे, शिस्तभंगाची कारवाई करणे याबाबत विनंती केली आहे.

अद्याप माहिती न दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे. तसेच आठ दिवसात आर.डी. च्या पावत्या संबंधीची माहिती देण्याचेहि जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. तेव्हा हे आदेश प्राप्त झाल्यापासून ८ दिवसात अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींचा माहितीचा अर्ज स्वीकारण्यास नकार देणे हे अधिनियमातील तरतुदीचा भंग करणारे आहे. तेव्हा अधिनियमाच्या कलम २० अन्वये जन माहिती अधिकारी यांच्यावर रु. ५०००/- एवढी शास्ती लादण्यात येत असून सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या वेतनातून वसूल करुन शासनाच्या विहित लेखाशिर्षाखाली जमा करुन चलनाच्या प्रती आयोगाकडे माहितीसाठी पाठवाव्यात. सबब खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ८ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी द्यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमाच्या कलम २० अन्वये रु. ५,०००/- एवढी शास्ती लादण्यात येत असून सदर रक्कम त्यांच्या वेतनातून वसूल करुन शासनाच्या विहित लेखाशिर्षाखाली जमा करुन चलनाच्या प्रती आयोगाकडे माहितीसाठी पाठवाव्यात.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २६ मार्च, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ३५२/०७

श्री. जितेंद्र हरिभाऊ ठाकुर -----अपीलार्थी
रा. अमळनेर, जिल्हा जळगांव

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य -----उत्तरवादी
प्रताप महाविद्यालय, अमळनेर,
जिल्हा जळगांव.
२.जन माहिती अधिकारी
प्रताप महाविद्यालय अमळनेर,
जिल्हा जळगांव.

---*विवेचन*---

श्री. जितेंद्र हरीभाऊ ठाकूर यांनी दि. १२/१२/२००७ रोजी आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यात आली. त्यावेळेला अपिलार्थी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी यांनी दि. २५/७/२००७ रोजी श्री. के.बी. जैन, ज्युनियर क्लार्क यांच्या स्टेनो ग्रेडच्या प्रमोशनच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागविली होती. परंतु माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने दि. २७/१०/२००७ रोजी प्रथम अपील केले. अपीलार्थींना दि. २६/११/२००७ रोजी छायांकित प्रतीसह उत्तर दिल्याचे आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला नमूद केले आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी उपस्थित राहिले नाहीत त्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थीनी विचारलेली माहिती त्यांना पुरविण्यात आल्याचे तसेच आठ दिवसात पुन्हा माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ३५३/०७**

**श्री. प्रा. पाटील दिलीपसिंग भागवत -----अपीलार्थी**
**प्लॉट नं. १० अ, डी.डी.नगर भाग २,**
**पारोळा, जिल्हा जळगांव, पारोळा- ४२५ १११.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य -----उत्तरवादी**
**प्रताप महाविद्यालय, अमळनेर,**
**जिल्हा जळगांव.**
**२.जन माहिती अधिकारी**
**किसान महाविद्यालय पारोळा,**
**जिल्हा जळगांव.**

***---विवेचन---***

प्रा. पाटील दिलीपसिंग भागवत यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. ६/१०/२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे. त्या अपीलाची सुनावणी दि.३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थी यांनी दि. १४/५/२००७ रोजी किमान कौशल्य विभागातील कोणत्या कर्मचा-यांचे जून १९९९ पासून अर्जाच्या दिनांकापर्यंत वेतन कापण्यात आले व हजेरी पटाची सत्यप्रत यांची मागणी केली होती. परंतु विहित कालावधीत माहिती न मिळाल्याने दि. ११/६/२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यानंतरही माहिती न मिळाल्याने दि. ६/१०/२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षकारांची बाजू समजून घेण्यांत आली. तसेच आयोगाकडील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. जन माहिती

**अधिकारी यांनी आठ दिवसात अपीलार्थींना माहिती उपलब्ध करण्याचे नमूद केले आहे व त्यास अपीलार्थीनी सहमती दर्शविली आहे. तेव्हा हे आदेश प्राप्त झाल्यापासून ८ दिवसांत अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करावी. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.**

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक. २६ मार्च, २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ३७१/०७**

**श्री. अशोक ओंकार बोरसे -----अपीलार्थी**
**हरिओम कॉलनी, प्लॉट नं.९, वलवाडी,**
**ता. जि. धुळे (डॉ. सिसोदिया यांच्या घराजवळ)**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) -----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद धुळे.**
**२.जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद धुळे.**

***---विवेचन---***

**श्री.अशोक ओंकार बोरसे, यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. १३/८/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील केले होते. सदर अपीलाची सुनावणी दि ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यात आली. त्यावेळी अपीलार्थी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी दि. १५/१/२००७ च्या अर्जान्वये (१) धुळे जिल्हा परिषदेत अनुसुचित जातीच्या कार्यरत, रिक्त व मंजूर प्राथमिक शिक्षकांची संख्या, (२) अनुसुचित जातीच्या कार्यरत प्राथमिक शिक्षकांची यादी (३)अनुसुचित जातीचे आंत जिल्हा बदली प्रस्तावाची यादी अशी माहिती मागविली होती. परंतु सदर माहिती विहित वेळेत न मिळाल्याने दि. २५/५/२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलानंतरही मागणी केलेली माहिती न मिळाल्याने दि. १३/८/२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले.**

**आयोगाकडील सुनावणीच्या वेळी अपीलार्थी उपस्थित राहिले नाहीत त्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही. परंतु सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम**

अपिलीय अधिकारी  यांनी त्यांची बाजू मांडली व प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या व शिक्षण सेवक भरतीची कार्यवाही सुरु होती.   त्यामुळे माहिती पुरविण्यास विलंब झाल्याचे नमूद केले.   परंतु सुनावणीच्या दिवशी मुद्दा क्र. १ व ३ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे व मुद्दा क्र.२  बाबत तालुका स्तरावरुन माहिती उपलब्ध होताच अपीलार्थीना देण्यात येईल असे नमूद केले.

आयोगाकडे उपलब्ध असलेली  कागदपत्रे यांची तपासणी करण्यात आली. उपस्थित अधिका-यांची बाजू ऐकून घेण्यात आली.  परंतु  अपीलार्थी उपस्थित नसल्याने त्यांची बाजू समजून घेता आली नाही.   असे असले तरी मुद्दा क्र. २ ची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसात अपीलार्थीना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची दक्षता जन माहिती अधिका-यांनी घ्यावी.

यापुढे विलंब टाळावा याची दक्षता जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी घ्यावी.  सबब खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक.  २६ मार्च, २००९     राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.अ/तक्रार क्रमांक ३६९/०१**

**श्री.सुनिल शंकरराव देशमुख -----तक्रारदार**
**मु.पो.कोतूळ, ता. अकोले,**
**जि. अहमदनगर.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक -----उत्तरवादी**
**प.पू. गगनगिरी महाराज व्रिद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,**
**पिंपरणे, ता.संगमनेर, जि. अहमदनगर- ४२२ ६०५.**

**---विवेचन---**

श्रीयुत सुनिल शंकरराव देशमुख, मु.पो. कोतूळ, जि. अहमदनगर यांनी दि. २४/११/२००८ रोजी अशी तक्रार केली की, दि. १४/१/२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक प.पू. गगनगिरी महाराज व्रिद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, यांच्याकडे माहिती मागितली असता माहिती मिळाली नाही व नंतर रु. ९५/- भरण्याचे पत्र उशीरा पाठवून ती रक्क्म दिल्यानंतर माहिती दिली.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" तक्रारदारांनी दि. १४/१/२००८ रोजी केलेल्या अर्जात पूर्वी दि. ६/११/२००७ रोजी केलेल्या अर्जातीलच काही मुद्दे व काही नवीन मुद्दे नमूद केलेले होते. यात नेमकेपणाबाबत संदिग्धता होती. तसेच मागणी केलेली माहिती ज्यांच्या संदर्भातील होती त्या कु. कोल्हे पी.एस यांनी व्यवस्थापना विरुध्द मे. पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण सोलापूर येथे अपील क्र.७/०७ दाखल केलेले आहे. सदर अपील हे मे. न्यायालयात प्रलंबित आहे. सदर केसकामी अपीलदार यांनी कागदपत्र मागणी अर्ज देवून सदर कागदपत्रांची मागणी केलेली आहे. तक्रारदारांनी मागणी केलेली कागदपत्रे मे. न्यायालयात दाखल आहेत. ही सर्व माहिती तक्रारदारास कळविण्यात आली होती.

तरी आपल्या कार्यालयाकडून केलेल्या सूचनेनुसार दि. १०/११/२००८ रोजी पुन्हा विद्यालयाकडून तक्रारदार श्री.सुनिल देशमुख यांना पत्र पाठवून कागदपत्रे झे्रॉक्सचा खर्च कळविण्यात आला.

श्री. सुनिल देशमुख यांनी दि. १७/११/२००८ रोजी सदर रक्कम रु.९५/- व्रिद्यालयाच्या कार्यालयात जमा केली व आवश्यक मागणी केलेली माहितीची कागदपत्रे त्यांना रक्कम जमा केल्यावर तात्काळ देण्यात आली. "

तक्रारदार मागत असलेली माहिती ही तृतिय पक्षाची होती व त्यासंबंधी न्यायालयात खटला सुध्दा प्रलंबित आहे. या कारणामुळे कागदपत्रे देता आली नाही. असे जरी असले तरी मुदतीत माहिती देता आलेली नाही, म्हणून माहिती देण्यासाठी तक्रारदारांकडून वसूल केलेली रक्कम रु.९५/- तक्रारदारास १५ दिवसांत परत करण्यात यावी.

***---आदेश---***

**तक्रार अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसांचे आंत तक्रारदार यांचेकडून माहिती देण्यासाठी वसूल केलेली रक्कम रु. ९५/- तक्रारदारांस परत करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक. ३० मार्च, २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३८१६५/अपील क्रमांक ४१०६/०२

श्री.धोंडीराम दासा जाधव -----अपीलार्थी
घर क्रमांक ३४९, राहूलनगर,
नागवाडी भाग-१, पी.एल. लोखंडे मार्ग,
चेंबूर, मुंबई - ४०० ०८९.

विरुध्द

१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी
झोन- ९, हिल रोड, बांद्रा (पश्चिम)
मुंबई - ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.

*---विवेचन---*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १५ जानेवारी,२००९
सुनावणीची तारीख ३०/३/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस जी माहिती पाहिजे आहे त्याबाबत न्यायालयात सुनावणी होऊन न्यायालयाने दि. ५/१२/२००८ रोजी सदर बाब पुन्हा तपासासाठी परत पाठविलेली आहे, व सदर गुन्हयाचा तपास चालू आहे म्हणून अपीलार्थीस हवी असलेली माहिती देता येत नाही हे जन माहिती अधिका-यांचे म्हणणे सयुक्तिक वाटते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील सद्य:परिस्थितीत अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ३० मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८१९२/अपील क्रमांक ४१०८/०२**

**श्री.अ.र. शेख ऊर्फ बाबा शेख -----अपीलार्थी**
**१९ अ/१०९, अष्टविनायक को.ऑप.हौ.सोसा.**
**मुईप प्रोजेक्ट बिल्डींग क्र. १९ अ, १ ला मजला,**
**टाटा नगर, मानखुर्द गोवंडी, मुंबई - ४०० ०४३.**

**विरुध्द**

**१. पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी**
**झोन- ९, हिल रोड, बांद्रा (पश्चिम)**
**मुंबई - ४०० ०५०.**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १५ जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख ३०/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**श्रीयुत बाबा शेख यांच्या अपीलामध्ये त्यांनी कलम १९(१) अन्वये अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अपीलामध्ये नमूद केलेली माहिती दिलेली नाही असे लिहिलेले आहे.**

**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून आले की, अपीलार्थीकडे मुळ प्रकरणात पोलीस उप आयुक्त यांना दाखल केलेल्या ॲफिडेव्हीटच्या प्रती आहेत. तसेच यासंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियमान्वये केलेल्या अर्जास अनुसरुन उप आयुक्त यांनी केलेला खुलासा हा त्यांना प्राप्त झालेला आहे. त्यामुळे**

माहिती देण्यामध्ये कांही कसूर झालेला आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलीय अधिकारी यांचा दि. ७/१/२००९ रोजीचा निर्णय योग्य वाटतो.

या केसमधील फौजदारी संहितेचे जे मुद्दे असतील ते अपीलार्थींनी कोर्टापुढे घ्यावेत.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८१९२/अपील क्रमांक ४१०५/०२**

**श्री. पीटर एम. डिमेलो -----अपीलार्थी**
**५०२, बी विंग, रिझवी महल को.ऑप.हौ.सो.**
**१०५, वॉटर फिल्ड रोड, वांद्रे (पश्चिम)**
**मुंबई - ४०० ०५०**

**विरुध्द**

**१. जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) -----उत्तरवादी**
**गृहनिर्माण भवन, रुम नं. ६९, वांद्रे (पूर्व)**
**मुंबई - ४०० ०५१.**
**२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक (सहकारी संस्था)**
**एच/वेस्ट वार्ड, सहकार बझार इमारत,**
**४ था मजला, वांद्रे स्टेशन समोर,वांद्रे (पश्चिम)**
**मुंबई - ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २० जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख ३०/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

**अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २२/१०/२००८ रोजीच्या आदेशान्वये अपीलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य केले होते. व अपीलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३-C यावर ३० दिवसांच्या आंत माहिती देण्याचे निर्देश दिले होते.**

**अपीलार्थीनी सुनावणीच्या वेळे असे सांगितले की, याबाबत त्यांना अजूनहि कुठच्याहि प्रकारे माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस हवी असणारी माहिती १० दिवसांचे आत देण्यात यावी.**

तसेच अपिलीय अपिलीय अधिका-यांचे आदेश कार्यान्वित न केल्याबद्दल व त्यामुळे अपीलार्थीस माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी  १५ दिवसांचे आंत आयोगात स्वतः उपस्थित राहून सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितानी वर दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक.  ३० मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८१९२/अपील क्रमांक ४१०९/०२**

**श्री. सुदत्त ना. जाधव -----अपीलार्थी**
**७/११२, डि.एन.नगर, बि.क्र. १,**
**तिरुपती को.ऑप.हौ.सो. , जे.पी रोड,**
**अपना बाजार समोर, अंधेरी (पश्चिम)**
**मुंबई - ४०० ०५३.**

**विरुध्द**

**१.सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी**
**सहायक मनपा आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**के/पश्चिम विभाग, अंधेरी (पश्चिम) मुंबई - ५८.**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का.)**
**सहायक मनपा आयुक्त बृहन्मुंबई मनपा कार्यालय,**
**के/पश्चिम विभाग, अंधेरी (पश्चिम) मुंबई - ५८.**

***<u>---विवेचन---</u>***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २० जानेवारी,२००९**
**सुनावणीची तारीख ३०/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**१० नोव्हेंबर, २००८ रोजी उपस्थित झालेल्या जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता के/पश्चिम विभाग यांच्या अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशाच्या सुनावणीच्या वेळी संबंधित माहिती ही इमारत प्रस्ताव विभागाशी संबंधित आहे असे सांगण्यात आले होते व त्यावेळी तसे माहिती अधिका-यांना अपिलीय अधिका-यांनी आदेश दिले की, तसे उत्तर अपीलार्थीस ७ दिवसाच्या आंत द्यावे.**

सुनावणीच्या वेळेस अपीलार्थीनी असेहि सांगितले की, त्यांनी इमारत प्रस्ताव विभागाकडेहि असा अर्ज केलेला आहे व आवश्यकता वाटल्यास त्यासंदर्भात वेगळयाने ते आयोगाकडे येतील. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० मार्च, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८१७५/अपील क्रमांक ४१०७/०२**

**श्री. डॉ. गिरीष संघवी -----अपीलार्थी**
**३, कृष्णा इमारत, ३४ खेतवाडी,**
**६ वी लेन, मुंबई - ४०० ००४.**

**विरुध्द**

**१.सचिव -----उत्तरवादी**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**१३ वा मजला, सेंटर-१, वर्ल्ड ट्रेड सेंटर,**
**कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.**
**२.जन माहिती अधिकारी**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**१३ वा मजला, सेंटर-१, वर्ल्ड ट्रेड सेंटर,**
**कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ३ फेब्रूवारी ,२००९**
**सुनावणीची तारीख ३०/३/२००९**
**अपीलार्थी , अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**डॉ. गिरीष संघवी यांनी आयोगाकडे त्यांच्या दि. १३/१/२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या आदेशा विरुध्द अपील दाखल केलेले आहे.**

**अपीलार्थीचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ अन्वये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या जन माहिती अधिका-यांकडे केलेला अर्ज हा त्यांनी दि. २२ ऑक्टोबर, २००८ रोजी सेक्रेटरी ऑफिस ऑफ दि इलेक्ट्रीसिटी ऑम्ब्यूडसमन यांच्याकडे पाठविला. व त्यास १० नोव्हेंबर, २००८ रोजीच्या पत्राने माहिती देण्यात आलेली आहे.**

मात्र अपीलार्थींनी प्रथम अपील हे अपिलीय अधिकारी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्याकडे केलेले आहे.

अपिलीय अधिका-यांच्या आदेशात "माहिती " या सदरात कोणत्या गोष्टी येतात याचे जे विवेचन केलेले आहे ते योग्य वाटते. मात्र जर अपीलार्थी डॉ. संघवी हे दिलेल्या माहितीने असमाधानी असतील तर त्यांनी अपिलीय अधिकारी ऑफिस ऑफ दि इलेक्ट्रीसिटी ऑम्ब्यूडसमन यांच्याकडे अपील करायला पाहिजे होते.

जन माहिती अधिकारी ऑफिस ऑफ दि इलेक्ट्रीसिटी ऑम्ब्यूडसमन यांनी माहिती देत असतांना त्यांचे अपिलीय अधिकारी कोण आहेत हे नमूद करावयास पाहिजे होते. त्यांनी तसे केले नाही याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

वरील आदेशाची एक प्रत जन माहिती अधिकारी , व अपिलीय अधिकारी, ऑफिस ऑफ दि इलेक्ट्रीसिटी ऑम्ब्यूडसमन यांनाही पाठविण्यात यावी.

अपीलार्थींनी आयोगाकडे दि. १३ जानेवारी, २००९ रोजी सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाविरुध्द सादर केलेले अपील अमान्य करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३० मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३४९६३/अपील क्रमांक ३६११/०२**

**श्री. मनोज एम. कारंडे -----अपीलार्थी**
**१, ज्योत्सना प्रकाश, १ ला मजला,**
**सिंडीकेट बँकेसमोर, गोरेगांव रेल्वे स्टेशनजवळ,**
**गोरेगांव (पूर्व) मुंबई - ४०० ०६३.**

**विरुध्द**

**१. विभागीय सहनिबंधक -----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**
**२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग,**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,**
**जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपीलार्थी श्री.मनोज एम. कारंडे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २७/५/२००८ च्या अर्जान्वये माहितीच्या अधिकारात श्री. संजिव चंद्रकांत पाटील व इतर यांच्या दि. २७/३/२००८ च्या तक्रार अर्जाबाबत एकूण ८ मुद्दे उपस्थित करुन माहिती मागितली होती. सदर अर्ज प्रत्यक्ष दि. २९/५/२००८ रोजी प्राप्त झाला. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २६/६/२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस उत्तर दिलेले होते. तथापि, मागणी केलेली माहिती ३०दिवसांचे आत न मिळाल्यामुळे अपीलार्थी**

यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे कलम १९(१) अन्वये दि. ३०/६/२००८ रोजी प्रथम अपील केले होते. सदर प्रथम अपील प्रत्यक्ष दि. ४/७/२००८ रोजी प्राप्त झाले. त्यावर अपिलीय अधिका-यांनी दि. १७/७/२००८ , दि. २४/७/२००८, दि. ४/८/२००८ तसेच दि. १२/८/२००८ रोजी अशा प्रकारे एकूण ४ वेळा अपीलार्थी यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची संधी देवूनहि अपीलार्थी एकाहि सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. त्यानंतर दि. १४/८/२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित करुन अपीलार्थीचे प्रथम अपील अमान्य केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि. १४/८/२००८ च्या आदेशाविरुध्द अपीलार्थी यांनी कलम १९(३) अन्वये दि. २२/९/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. ज्यावर दि. ३१/१/२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीच्या वेळी स्वतः अपीलार्थी तसेच श्री.संदिप आमणे, जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई हे उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी यांनी मांडलेली मते तसेच उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी करता असे दिसून येते की, जन माहिती अधिका-यांनी मुदतीत उत्तर दिलेले असून वस्तुस्थितीस धरुन दिलेले आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशात बदल करण्याची आवश्यकता दिसत नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश----***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३० मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७४२/अपील क्रमांक ४११३/०२**

**श्री. महादेव दत्तात्रय साळवे -----अपीलार्थी**
**संकल्प, सी/४, न्यू लिबर्टी को.हौ.सोसा.**
**भंडारवाडा रोड, आयोजन नगर जवळ,**
**मालाड (पश्चिम) मुंबई - ४०० ०६४.**

**विरुध्द**

**१. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था) -----उत्तरवादी**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.**
**२.जन माहिती अधिकारी तथा उप सहायक पोलीस महानिरीक्षक**
**( आस्थापना- २ )**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ३ फेब्रूवारी ,२००९**
**सुनावणीची तारीख ३०/३/२००९**
**अपीलार्थी , व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

श्रीयुत महादेव साळवे यांना सन १९८१ ते १९८९ या कालावधीत पोलीस उपनिरीक्षक पदाची शासनाने त्या त्या वर्षी मंजूर केलेली पदसंख्या, प्रत्यक्ष ट्रेनिंगला पाठविलेल्या त्या त्या वर्षाची पदांची पदसंख्या, वगैरे माहिती पाहिजे होती.

मात्र सदरील रेकॉर्ड बराच जुना असल्यामुळे सदरची माहिती त्या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही म्हणून देण्यात आलेली नाही व अपिलीय अधिका-यांनी सुध्दा या परिस्थितीशी सहमत होत अपील अमान्य केले होते त्याविरुध्द हे सदरचे अपील आहे.

**सन १९८१ ते १९८९ या कालावधीत पोलीस उपनिरीक्षक पदाची शासनाने मंजूर केलेली पदसंख्या ही प्रत्यक्ष शोधून काढणे हे जरी अत्यंत जिकीरीचे असले तरी या कालावधीत ट्रेनिंगला पाठविण्यांत आलेल्या किंवा ज्या पोलीस उपनिरीक्षकांचे ट्रेनिंग पोलीस ट्रेनिंग कॉलेज नाशिक येथे झालेले आहे. त्याची माहिती नाशिक पोलीस ट्रेनिंग कॉलेजमध्ये सापडण्याची बरीच शक्यता आहे. तेव्हा अपीलार्थीचा अर्ज मुद्दा क्र. २ व ३ याबाबत माहिती देण्यासाठी पोलीस ट्रेनिंग कॉलेजकडे पाठविण्यात यावा व त्यानी ही माहिती अपीलार्थीस १५ दिवसांच्या आत पुरवावी असे निर्देश देण्यांत आले.**

***---आदेश---***

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक. ३१ मार्च, २००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७४३/अपील क्रमांक ४११०/०२**

**श्री. अनिल वेदव्यास गलगली -----अपीलार्थी**
**२, जुना खारवाला चाळ, काजूपाडा,**
**साकीनाका, मुंबई - ४०० ०७२.**

**विरुध्द**

**१. संचालक (अ.से.व प्र.) -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**३ रा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई - ४०० ००१.**
**२.जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता (विकास नियोजन)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**४ था मजला, महापालिका मार्ग, फोर्ट,**
**मुंबई - ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ४ फेब्रूवारी ,२००९**
**सुनावणीची तारीख ३०/३/२००९**
**अपीलार्थी , व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी यांना शहर व उप नगरातील सिमेंट प्लांट (रेडीमिक्स) बाबतची माहिती पाहिजे होती. व सदरील माहिती ही उपप्रमुख अभियंता (इ.प्र.) यांच्या कार्यालयाशी संबंधित आहे व संबंधित बाबीकरीता कार्यकारी अभियंता (इ.प्र)हे जन माहिती अधिकारी आहेत असे प्रमुख अभियंता विकास नियेजन यांचे कार्यालय यांनी अपीलार्थीस कळविले, व अपीलार्थीचा अर्ज चार कार्यकारी अभियंत्यांकडे पाठविण्यात आला. मात्र अपीलार्थीस समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे अंतिमतः त्यांनी आयोगाकडे धाव घेतली.**

अपिलीय अधिका-यांनी त्यांच्या आदेशात रेडिमिक्स प्लांटचे परवानगीसंबंधीचे प्रकरण हे वेगळयाने तपासले जात असल्याने त्यांची एकत्रित स्वरुपात माहिती नाही असे स्पष्ट केलेले आहे. मात्र अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चा करुन दि. ६ एप्रिल, २००९ रोजी दुपारी ३-०० वाजता अपीलार्थींनी कार्यकारी अभियंता (इ.प्र.) पूर्व उपनगरे यांच्या कार्यालयात उपस्थित रहावे व या प्रकरणामध्ये महापालिका आयुक्तांची मान्यता प्राप्त झालेली आहे अशा दोन प्रकरणांच्या संपूर्ण नस्त्या अपीलार्थीस दाखवाव्यात व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य देण्यात याव्यात असे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ मार्च, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३७७०७/अपील क्रमांक ४०६७/०२
क्रमांक-मु.मा.आ/ ३७७०८ /अपील क्रमांक ४०८१/०२
क्रमांक-मु.मा.आ/ /अपील क्रमांक ४०८२/०२
क्रमांक-मु.मा.आ/३६६१४ /अपील क्रमांक ४१९४/०२

श्री. लेसली अलमेडा -----अपीलार्थी
कासा अलमेडा, फ्लॅट नं. १०३,
१ सेंट जोसेफ रोड, सेंट पॉल रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०.

विरुध्द

१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था -----उत्तरवादी
गृहनिर्माण भवन, म्हाडा इमारत,
तळमजला, रुम नं. ६९, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१
२.जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक, सहकारी संस्था
एच/वेस्ट वार्ड, सहकार बाझार इमारत,
४ था मजला, वांद्रे रेक्लमेशन समोर,
वांद्रे (पश्चिम) मुंबई - ४०० ०५०

*---विवेचन---*

अपील क्र. ४०६७, ४०८१ व ४०८२ या तीन अपीलांची सुनावणी दि. २४ मार्च, २००९ रोजी घेण्यात आली होती. तसेच अपीलार्थी व जन माहिती अधिकारी तेच असल्यामुळे या दोन पार्टीचे राज्य माहिती आयुक्तांकडे होणा-या याच विषयावरील दि. २६ मार्च, २००९ रोजी ठेवण्यात आलेल्या अपीलाची सुनावणी (जुना अपील नं २०४७ नवीन अपील नं. ४१९४) अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या विनंतीनुसार त्याच वेळेला घेण्यांत आली.

अपीलार्थींनी दि सॉलशेट कॅथॉलिक को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड वांद्रे (पश्चिम) या संस्थेच्या बाबतीत कांही अर्ज करुन बरीच माहिती मागविली होती.

याबाबतीत अपीलार्थीस संबंधित संस्थेच्या धारिका तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात असे आदेश प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आहेतच.

तसेच सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक यांनी असे सांगितले की, अनेकदा निर्देश देवूनहि संस्थेने निर्देशित नमूद केलेली माहिती त्यांच्या कार्यालयास तसेच अपीलार्थी यांना दिलेली नाही. दि सॉलसेट कॅथॉलिक को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड ही संस्था, उपनिबंधक सहकारी संस्थेने दिलेल्या निर्देशाचे तसेच सहकार कायद्याचे व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांचे पालन करीत नाही असे सहकार कार्यालयाचे मत झाल्यामुळे वरील संस्थेची व्यवस्थापन समिती बरखास्त करुन त्याठिकाणी प्रशासकाची नियुक्ती का करण्यात येवू नये याबाबतचा लेखी खुलासा दि. ८/४/२००९ रोजी सादर करावा असे आदेश पारित केलेले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस असेहि सांगितले की, अपीलार्थींना जी माहिती द्यायची राहिलेली आहे तीहि अपीलार्थीस देण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळे या चारहि अपीलांच्या सुनावणीअंती असे दिसून येते की, अपीलार्थीस उप निबंधक कार्यालयाकडील धारिण्या तपासायला मिळालेल्या आहेतच. संस्थेकडील जी माहिती मिळू शकली नाही त्याबद्दल अतिशय कडक कारवाई करण्याचे उपनिबंधक यांनी योजले आहे, व उर्वरित माहिती सुध्दा संस्थेकडून मिळवून देण्यासाठी जन माहिती अधिकारी स्वतः कार्यवाही करीत आहेत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

४ ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग यांनी सुनावणीच्या वेळेला नमूद केलेली कार्यवाही पूर्ण करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७३९/अपील क्रमांक ४११४/०२**

**श्री. डॉ. श्रीकांत सखाराम प्रभू -----अपीलार्थी**
**बी-२३, उद्यान प्रभा, तेजपाल स्कीम रोड नं.२,**
**विलेपार्ले (पूर्व) मुंबई - ४०० ०५७.**

**विरुध्द**

**१. सचिव -----उत्तरवादी**
**मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय,**
**मुंबई - ४०० ०३२.**
**२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय,**
**मुंबई - ४०० ०३२.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ६ फेब्रूवारी ,२००९**
**सुनावणीची तारीख ३०/३/२००९**
**अपीलार्थी , व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**म्हाडाच्या दोन अधिका-यांविरुध्द फौजदारी प्रक्रिया सुरु करण्यासाठी परवानगी कोण देवू शकतो, या व इतर कांही अनुषंगिक माहितीच्या बाबतीत अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय यांच्याकडे अर्ज केला होता. हा अर्ज त्या कार्यालयाने सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्याकडे त्या कार्यालयाचे जन माहिती अधिका-यांनी माहिती देण्यासाठी क्रमांक-मुसका २००८/माअ-५०९/का.१ २४/९/२००८ ने पाठविला.**

**मात्र आपणाला हवी असणारी माहिती मुख्य सचिव कार्यालयानेच द्यावी असा**

**अपीलार्थी यांचा आग्रह असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय यांचेकडे केले. सदरचे अपील प्रथम अपिलीय अधिकारी मुख्य सचिवांचे कार्यालय यांनी फेटाळून लावले. त्याविरुध्द हे सदरचे अपील आहे.**

**प्रथम अपिलीय अधिका-यांनी आपल्या आदेशात पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे.**

**"माहितीच्या अधिनियमानुसार शासनाच्या प्रत्येक कार्यालयाने माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी नेमणे बंधनकारक असून ज्या नागरिकांना माहिती जाणून घ्यावयाची आहे त्यांनी अशा माहितीसाठी कायद्याखाली नेमलेल्या योग्य माहिती अधिका-यांकडेच अर्ज केला पाहिजे. परंतु मुळातच गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारितील या विषयावर संबंधित विभागाकडून आवश्यक कार्यवाही करणे अभिप्रेत असल्याचे अपीलकारास ज्ञात असूनही मुख्य सचिवांच्या कार्यालयातील माहिती अधिका-यांकडूनच माहिती उपलब्ध झाली पाहिजे ही अपीलकाराची मागणी कायदेशीर तरतुदीशी सुसंगत नाही. मुख्य सचिवांच्या कार्यालयाने सर्वच शासकीय विभागांची माहिती देणे माहितीच्या कायद्यानुसार बंधनकारक आहे हा अपीलकाराचा गैरसमज असून तो माहितीच्या अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही.**

**अपीलकाराची " माहिती मिळण्याचा अधिकार" व "तक्रारीला उत्तर मिळविण्याची अपेक्षा" या दोन्ही बाबींमध्ये गफलत होत आहे असे दिसते. माहितीच्या अधिकाराप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्याचे अधिकार ही बाब या अधिनियमात अंतर्भूत असून त्यासाठी यंत्रणा व पध्दत माहितीचा अधिकार या अधिनियमात नमूद केली आहे. मात्र या तरतुदीचा उपयोग करुन एखादया अधिका-याविरुध्द तक्रार करण्याची अपीलकाराची धारणा ही माहितीच्या अधिकाराच्या कार्यक्षेत्रात येत नाही. खेरीज ही बाब मुख्य सचिव कार्यालयाच्या माहिती अधिका-यांच्या कक्षेबाहेरील आहे.**

**अपीलकाराच्या मूळ अर्जावरील माहिती अधिका-याचे उत्तर त्यांच्या अर्जाशी सुसंगत असूनही व त्या अनुषंगाने अपीलकारास विहित कालावधीत कळविण्याची कृती योग्य असूनही, मुख्य सचिव कार्यालयातील माहिती अधिका-यांनीच अर्जामध्ये मागितलेली माहिती द्यावी. किंबहूना त्यांच्या तक्रारीचे निवारण करावे ही अपीलकाराची अपेक्षा माहितीचा**

अधिकार अधिनियम, २००५ च्या कार्यक्षेत्रात बसत नाही व त्यामुळे त्यांनी केलेली अपीलातील विनंती फेटाळण्याशिवाय पर्याय नाही. "

प्रथम अपिलीय अधिका-यांचे हे निवेदन योग्यच आहे. मात्र अपीलार्थींचा अर्ज हा गृहनिर्माण विभागाकडे पाठविल्यानंतर अजूनहि अपीलार्थीस कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही हे मात्र योग्य नाही. त्यामुळे अपीलार्थींच्या अर्जावर जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांनी अपीलार्थीस काय माहिती दिली याचा खुलासा त्यांच्या विभागाच्या सचिवांमार्फत १० दिवसांच्या आत आयोगास पाठवावा.

सदरील आदेशाची प्रत ही जन माहिती अधिकारी, तसेच सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनाहि पाठविण्यात यावी.

***---आदेश---***

अपिलीय अधिकारी, मुख्य सचिव या कार्यालय यांच्या आदेशाविरुध्द केलेले अपील अमान्य करण्यात येत आहे. मात्र गृहनिर्माण विभागाने वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७२७/अपील क्रमांक ४११९/०२**

**श्री. सुरेश के. चोक्सी -----अपीलार्थी**
**बी/६५, उदधीतरंग , जुहू रोड,**
**मुंबई - ४०० ०४९.**

**विरुध्द**

**१. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था (३)मुंबई -----उत्तरवादी**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र. ६९,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**
**२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक**
**सहकारी संस्था के/पश्चिम**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र. ६९,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १४ फेब्रूवारी ,२००९**
**सुनावणीची तारीख ३१/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींची मागणी त्यांच्या उदधीतरंग को.ऑप.हौ.सो. या संस्थेच्या दप्तर तपासणीची व मॅनेजिंग कमिटी विरुध्द कारवाई करण्याची आहे.

अपीलार्थीस दि. २९/९/२००८ रोजीच्या पत्राने संस्थेच्या दप्तराची तपासणी घेण्यात येत असून दप्तर तपासणी झाल्यानंतर त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल व त्याअनुषंगाने अपीलार्थी यांना कळविण्यांत येईल असे कळविण्यांत आले.

ही वस्तुस्थिती अपिलीय अधिका-यांनी मान्य केलेली आहे व त्याप्रमाणे अपीलार्थींचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे. त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की,  त्यांच्या अखत्यारित २३०० पेक्षा जास्त गृहनिर्माण संस्था येतात.  दिड महिन्यात या संस्थेची चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपीलार्थीस त्या चौकशीबाबत माहिती देण्यात येईल.  त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  ३१ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७२७/अपील क्रमांक ४१२१/०२**

**श्री. नदीन उमरभॉय -----अपीलार्थी**
**नरिमन इमारत, ६ वा मजला,**
**फ्लॅट नं. १२ अ, १६८, एम.के.रोड,**
**मुंबई - ४०० ०२१.**

**विरुध्द**

**१. सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**डी वार्ड, नाना चौक, जोबनपूत्र कंपाऊंड,**
**ग्रँट रोड (पश्चिम) मुंबई - ४०० ००७.**
**२.जन माहिती अधिकारी सहायक अभियंता (इ.व.का.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**डी वार्ड, नाना चौक, जोबनपूत्र कंपाऊंड,**
**ग्रँट रोड (पश्चिम) मुंबई - ४०० ००७.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २३ जानेवारी, २००७ मात्र अपील अपूर्ण असल्यामुळे त्यासोबतचे कागदपत्र अपीलार्थी यांनी १७ जानेवारी २००९ रोजी सादर केले.**
**सुनावणीची तारीख ३१/३/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस रुसी व्हिला पेडर रोड येथील १ ल्या मजल्याच्या इन्स्पेक्शन रिपोर्टच्या बाबतीत काही माहिती व खुलासे पाहिजे होते. व दि. ९ नोव्हेंबर,२००६ च्या अर्जास दि. २ डिसेंबर, २००६ रोजी उत्तर देण्यांत आले. त्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे सादर केलेल्या दि. १४ डिसेंबर, २००६ रोजीच्या अपीलावर दि. १९ जानेवारी, २००७ रोजीच्या**

आदेशाने  जन माहिती अधिकारी यांनी टेनंटेबल दुरुस्तीची अधिक माहिती  द्यावी असे निर्देश दिले.   त्याप्रमाणे अपीलार्थीस ती माहिती देण्यांत आली.

अपीलार्थीनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आलेली आहे.   तसेच  जन माहिती अधिका-यांनी  दि. २/१२/२००६ रोजीच्या उत्तरात अपीलार्थीस हवे असल्यास नस्तीची तपासणी ते करु शकतात असेहि नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे आयोगाकडील सुनावणीच्या वेळेला आवश्यकता भासल्यास अपीलार्थी नस्तीची पाहणी करतील असे त्यांनी सांगितले.  त्याप्रमाणे  दि. ८ एप्रिल, २००९ रोजी  दुपारी ३-०० वाजता अपीलार्थी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून नस्तीची पाहणी करतील. त्यासंबंधी लागणारे आवश्यक ते सहकार्य  जन माहिती अधिकारी यांनी करावयाचे आहे. तसेच अपीलार्थी यांना हव्या  असणा-या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी द्यावध्यात.

***---आदेश--***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक.  ३१ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७४९/अपील क्रमांक ४१२२/०२**

**श्री. शेखर नामदेव गांगण -----अपीलार्थी**
**शिरोडकर मंडई, ३ रा माळा, रुम नं. ७५,**
**जे.बी. रोड, परेल, मुंबई - १२.**

**विरुध्द**

**१. उप आयुक्त (अभियांत्रिकी) -----उत्तरवादी**
**उप आयुक्त (पर्यावरण आणि कचरा व्यवस्थापन)**
**यांचे कार्यालय, लव्ह ग्रोव्ह कॉम्प्लेक्स,**
**८९, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - १८.**
**२.जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अभियंता (घ.क.व्य.)**
**उप आयुक्त (पर्यावरण आणि कचरा व्यवस्थापन)**
**यांचे कार्यालय, लव्ह ग्रोव्ह कॉम्प्लेक्स,**
**८९, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - १८.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ६**
**सुनावणीची तारीख ३१/३/२००९**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी हे स्वतः मुंबई महापालिकेचे चालक दादर यानगृह आहेत. त्यांना दादर यानगृह येथे सकाळच्या पाळीतील अतिरिक्त कामाविषयीची कांही माहिती पाहिजे होती. यातील कांही माहिती ही "माहिती" या संज्ञेमध्ये मोडत नसल्याचे कळविले व कांही मुद्दयांवर माहिती देण्यांत आली. तसेच अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींचे प्रश्न हे प्रशासनीक स्वरुपाचे असल्यामुळे त्याबाबतची योग्यती तक्रार सक्षम अधिका-यांकडे करावी,**

त्याबाबत कारवाई करण्यांत येईल असे अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस सल्ला सुध्दा दिला. असे जरी असले तरी अपीलार्थींनी आयोगाकडे अपील केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला मात्र अपीलार्थीस प्रत्येक मुद्दयावरील प्रश्नांचा खुलासा हा अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त यांनी आयोगास सादर केलेला आहे. तो खुलासा अपीलार्थीस देण्यात यावा असे निर्देश देण्यांत आले. तसेच उप आयुक्तांनी अपीलार्थींच्या कांही प्रशासनीक प्रश्न असतील तर ते सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे मान्य केले. त्यामुळे पुढील आदेश देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३८७५२/अपील क्रमांक ४१२४/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे -----अपीलार्थी**
**२०४, राजबाग, भालचंद्र मार्ग,**
**माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.**

**विरुध्द**

**१. उपमुख्य अभियंता (इ.प्र) -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**ई विभाग, भायखळा, मुंबई - ४०० ००८**
**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**ई विभाग, भायखळा, मुंबई - ४०० ००८**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ६ फेब्रूवारी, २००९**
**सुनावणीची तारीख ३१/३/२००९**
**अपीलार्थी व जनमाहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस हॅपी व्हॅली रिअर इस्टेट प्रा.लि. यांनी राजबागच्या रहिवाश्यांसाठी पेनल्टी भरली असल्यास त्याची पावती व भरली नसल्यास त्यावर काय कारवाई करण्यात आली याची माहिती मागितली होती.**

**अपीलार्थीस भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याआधी जर रहिवासी इमारतीत रहावयास आले तर दंड भरावा लागतो. सदर इमारतीचा पूर्णत्वाचा दाखला दि.१६/९/२००४ रोजी स्वीकारण्यात आलेला आहे अशी माहिती दिली.**

**प्रथम अपिलीय निर्णयात अपीलार्थीस असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, सदर**

धारिणीत उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन तसेच सदर धारिणीची पाहणी केल्यानंतर असे निदर्शनास आले की, सदर इमारतीचा पूर्णत्वाचा दाखला देताना त्या इमारतीमध्ये रहिवाशी राहात होते किंवा नाही याबाबतचा उल्लेख सापडत नाही. जर रहिवाशी राहातच नसतील तर दंड भरावा लागत नाही व सदर बाबत पेनल्टी वसूल करण्यात आलेली नाही. त्यामुळे नस्तीप्रमाणे असलेली सर्व माहिती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. अपीलार्थीस संबंधित धारिणीमध्ये उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याउप्परहि डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्यूलेशन नुसार दंड व्हावयास पाहिजे होते असे अपीलार्थीस वाटत असेल तर त्यांनी प्रशासनीकदृष्टया महापालिका आयुक्तांकडे दाद मागावी.

***---आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ३१ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/सीआर क्रमांक ३५०/०७**

**श्री.विजय दोधा पाटील** -----**अपीलार्थी**
**रा. भडगांव, ता. भडगांव, जिल्हा जळगांव**

**विरुध्द**

**१. जिल्हा उपनिबंधक** -----**उत्तरवादी**
**सहकारी संस्था जळगांव.**
**२. जन माहिती अधिकारी तथा सहनिबंधक**
**सहकारी संस्था भडगाव, जि.जळगांव.**

***---विवेचन---***

**श्री. विजय दोधा पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. ५/११/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३)अन्वये जे द्वितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थी यांनी भडगांव तालुक्यातील विविध पतसंस्थांच्या अनुषंगाने पाच मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ७/८/२००७ च्या अर्जान्वये माहिती मागविली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. ६/९/२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने चार मुद्दयांवरील माहितीने समाधान न झाल्याने दि. २५/९/२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलाची सुनावणी दि. १९/१०/२००७ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी अपीलार्थींनी केलेला लेखी खुलासा लक्षात घेवून अपीलार्थींना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती देण्याबाबत दि. २०/१०/२००७ रोजी आदेश पारित केले. परंतु अपीलार्थींचे म्हणणे ऐकून घेतले नाही. जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई केली नाही असे नमूद करुन आयोगाकडे दि. ५/११/२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.**

**द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी घेतली. त्यावेळी अपीलार्थी, जन**

माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची बाजू समजून घेण्यात आली. तसेच उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली .

आयोगाकडील सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलानंतर अपीलार्थीना दि. १५/११/२००७ च्या पत्रान्वये (पण ज्यावर जनमाहिती अधिकारी यांची सही दि.२३/११/२००७ ची आहे.) रु. २०/- भरुन माहिती घेवून जाण्याचे कळविले. परंतु तद्‌नंतर अपीलार्थी शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेले नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे. अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २०/१०/२००७ चे आहेत. ते जन माहिती अधिकारी पाहून दि. ३१/१०/२००७ ला त्यांनी त्यांचे अधिनस्त कर्मचाऱ्यास कार्यवाहीचे आदेश दिलेले दिसतात. अपिलीय अधिका-यांनी किती मुदतीत माहिती द्यावी असे जरी नमूद केले नसले तरी अशा परिस्थितीत १०-१५ दिवसांत अशी माहिती देण्यात यावी अशी अपेक्षा आहे. म्हणजेच दि. १५/११/२००७ रोजी अपीलार्थीस उत्तर जाणे आवश्यक होते. अपीलार्थीस लिहिलेले पत्र जरी दि. १५/११/२००७ चे दाखविलेले असले तरी त्यावर जन माहिती अधिकारी यांची सही दि. २३/११/२००७ ची आहे. म्हणजेच प्रत्यक्ष पत्र त्यानंतरच निर्गमित झाले असणार. त्यामुळे कमीत कमी विलंब हा ८ दिवसांचा तर निश्चित आहे. त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर ८x२५० =रु. २०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या वेतनातून वसूल करुन शासनाच्या विहित लेखाशिर्षाखाली जमा करावी व चलनाची प्रत आयोगाकडे माहितीसाठी पाठवावी.

तसेच अपीलार्थीनीमागणी केलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ८ दिवसांत अपीलार्थीना विनामूल्य द्यावी. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यावर रु.२,०००/- ची शास्ती लादण्यात येत असून सदर शास्तीची रक्कम त्यांच्या वेतनातून जिल्हा उपनिबंधक यांनी वसूल

**करुन शासनाकडे विहित पध्दतीनुसार जमा करावी व चलनाची प्रत आयोगाकडे माहितीसाठी पाठवावी.**

**सदर आदेशाची प्रत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था  जळगांव यांनाहि कार्यवाही व अनुपालनासाठी पाठविण्यात यावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक.  ३१ मार्च, २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/सीआर क्रमांक ३४४/०७**

**श्री.भरत भास्कर झोपे -----अपीलार्थी**
**रा. वरणगांव झोपेवाडा,**
**जिल्हा जळगांव.**

**विरुध्द**

**१. शिक्षणाधिकारी -----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद जळगांव.**
**२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**महात्मा गांधी विद्यालय,**
**वरणगांव, ता.भुसावळ, जि.जळगांव.**

***---विवेचन---***

**श्री. भरत भास्कर झोपे यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. २६/१२/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थी यांनी दि. २०/९/२००७ च्या अर्जान्वये महात्मा गांधी विद्यालय, वरणगांव , ता.भुसावळ, जि.जळगांव येथे सन २००२-२००३ मध्ये नियुक्त झालेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मान्यतेच्या प्रस्तावाच्या प्रती व शिक्षणाधिकारी तसेच शिक्षण उपसंचालक यांच्या मान्यतेच्या आदेशांच्या प्रतींची मागणी केली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २/१०/२००७ च्या पत्रात नमूद केलेल्या कारणास्तव मागणी फेटाळली. त्यामुळे व्यथित होवून दि. २६/१०/२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यावर उत्तर न मिळाल्याने दि. २६/१२/२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले.**

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे मान्य केले तर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीचे दि. २६/१०/२००७ चे प्रथम अपील प्राप्तच झाले नसल्याचे नमूद केले.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती आयोगाकडील सुनावणीच्या दिवशी अपीलार्थींना देण्यात आली असून सदर माहिती मिळाल्याचे व तक्रान नसल्याचे अपीलार्थींनी आयोगाला लेखी दिले आहे. प्राप्त परिस्थितीत खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/सीआर क्रमांक ३४५/०७**

**श्री.विजय गोविंद नागपुरे -----अपीलार्थी**
**१९, कमलकुंज, श्रीरत्न कॉलनी, पिंप्राळा परिसर,**
**मुंदडा हायस्कूल जवळ, जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय प्राधिकारी -----उत्तरवादी**
**अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**बांभोरी, जळगांव**
**२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य**
**अभियांत्रिकी महाविद्यालय,**
**बांभोरी, जळगांव**

***---विवेचन---***

श्री. विजय गोविंद नागपुरे यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. २०/११/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते.

अपीलार्थी यांनी दि. १०/३/२००७ रोजीच्या अर्जान्वये श्रमसाधना मुंबई ट्रस्ट संचलीत अभियांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी, जळगांव येथे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या दि. २४/२/२००७ रोजी आयोजित केलेल्या सभेसंबंधीचे दस्तऐवज, सभेची नोटीस, सभेचे प्रयोजन इत्यादी १२ मुद्दयांवर सविस्तर माहिती मागविली होती. परंतु सदर अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने दि. २७/९/२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्याचीही दखल घेतली नाही असे नमूद करुन दि. २०/११/२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला दि. २/६/२००७ व दि. ७/३/२००८ च्या पत्रान्वये माहिती दिल्याचे नमूद करण्यात आले. तर माहिती दिल्याने प्रथम अपीलावर

कार्यवाहीची आवश्यकता नसल्याचे प्रथम अपीलाच्या बाबतीत नमूद करण्यात आले आहे. अपीलार्थी यांनी संपूर्ण माहिती मिळवून देण्याची व जन माहिती अधिकारी यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना दिलेल्या माहितीची प्रत उपलब्ध केली नाही. त्यामुळे माहितीची खात्री करुन घेता येत नाही. असे असले तरी मागणी केलेली माहिती एक महिन्यात देण्यास तयार असल्याचे नमूद केले आहे.

अपीलार्थींनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती अधिक आहे तरीही जन माहिती अधिकारी यांनी मान्य केल्याप्रमाणे हे आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्यात अपीलार्थींना माहिती देण्यात यावी. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/सीआर क्रमांक २९१/०७**

**श्री.ओमप्रकाश गोपालदास बढेजा -----अपीलार्थी**
**सिधी कॅम्प, रुम नं. ९, अमळनेर,**
**जिल्हा जळगांव.**

**विरुध्द**

**१. अधीक्षक -----उत्तरवादी**
**भूमि अभिलेख जळगांव,**
**जिल्हा जळगांव.**

**२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक**
**भूमि अभिलेख ,अमळनेर,**
**जिल्हा जळगांव.**

***---विवेचन---***

**श्री. ओमप्रकाश गोपालदास बढेजा यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. २८/७/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि. २/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित नव्हते.**

**अपीलार्थीनी दि. २८/३/२००७ च्या अर्जान्वये मौजे अमळनेर येथील नगर भूमापन हद्दीतील अ.भू.क्र.(टि.पी.) ६०/३/८/ व ६०/३/९ या मिळकतीत सरोजबहन शहा यांचे क्षेत्रफळ किती व इतर मालकांची नांवे याची माहिती मागविली असता जन माहिती अधिकारी यांनी दि. २५/४/२००७ च्या पत्रान्वये सदर भूखंडातील एकूण क्षेत्र कळविले. परंतु मालक कोण हे कळविले नाही. त्यामुळे अपीलार्थीनी दि. २९/५/२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यावर दि. ३०/६/२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केले. असे असले तरी दोन्ही अधिका-यांनी दिलेल्या माहितीत अपीलार्थीरंना फरक दिसतो. त्यामुळे आयोगाकडे दि. २८/७/२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले.**

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची बाजू समजून घेण्यांत आली. अपीलार्थी गैरहजर राहिल्यामुळे त्यांची बाजू समजून घेता आली नाही. तसेच सदर प्रकरणात आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती संबंधित अधिका-यांनी मूळ अभिलेखावरुन दिली असल्याने अपील निकाली काढणे योग्य वाटते. तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या माहिती अपीलार्थींना फरक आढळत असल्यास जो अभिलेख त्यांना चुकीचा वाटतो त्याच्या दुरुस्तीसाठी जमीन महसूल संहितेप्रमाणे दाद मागता येईल. तेव्हा सदर अपीलाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/सीआर क्रमांक २८७/०७**

**श्री. विलास पतिंगराव पाटील -----अपीलार्थी**
**रा-दोंदवाडे, पो. निमगव्हाण,**
**ता. चोपडा, जिल्हा जळगांव**

**विरुध्द**

**१. जिल्हा उपनिबंधक -----उत्तरवादी**
**सहकारी संस्था चोपडा, जि.जळगांव**
**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक**
**सहकारी संस्था चोपडा, जि.जळगांव.**

***---विवेचन---***

**श्री. विलास पतिंगराव पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. १७/९/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे व्दितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि. २/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी केवळ जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थी यांनी दि. २६/२/२००७ च्या अर्जान्वये श्री. विजय अमृतराव पाटील यांचेकडून संस्थेने दि. ३०/७/२००१ व दि. १५/९/२००१ रोजी घेतलेली खाजगी स्वरुपातील अनामत रक्कम अनुक्रमे रु.१५,०००/- व रु. ६९०/- परत केली किंवा कसे याबाबत सविस्तर माहिती मागविली होती. परंतु सदर माहिती न मिळाल्याने दि. ५/५/२००७ रोजी प्रथम अपील केले. त्या अनुषंगाने दि. २३/५/२००७ व दि. ५/६/२००७ रोजी सुनावणी घेवून अपील मान्य केले. तसेच संस्थेचे सचिव यांनी अपीलार्थींनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या नकला व माहिती अपीलार्थींना दि. १२/६/२००७ पर्यंत देण्याचे दि. ५/६/२००७ रोजी आदेश पारित केले. परंतु माहिती न मिळाल्याचे नमूद करुन दि. १७/९/२००७ रोजी अपीलार्थींनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.**

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला केवळ जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यांनी केवळ संस्थेने माहिती देणेबाबत आदेश पारित केल्याचे नमूद केले आहे. अपीलार्थी सुनावणीच्या वेळेला उपस्थित नसल्याने माहिती उपलब्धतेबाबत त्यांची बाजू समजून घेता आली नाही.

वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना माहिती देण्यासाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशांचे पालन करण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले दिसत नाही. आपल्या आदेशाचे पालन करुन घेण्याची जबाबदारी अपिलीय अधिकारी यांची आहे. अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती संस्थेमार्फत उपलब्ध करुन द्यावी व तसे आयोगास अवगत करावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाचे पालन झाल्याची खात्री करुन तसे आयोगास अवगत करण्याची दक्षता घ्यावी. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/सीआर क्रमांक ३३८/०७**

**श्री. व्ही. आर. गातेकर -----अपीलार्थी**
**रा. भाटखेडा रोड, शिक्षक कॉलनी,**
**श्री.तुकाराम हरी कोळी यांच्या घराशेजारी,**
**रावेर, ता.रावेर, जि.जळगांव.**

**विरुध्द**

**१. विभाग नियंत्रक -----उत्तरवादी**
**राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव.**
**२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी**
**राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग, जळगांव.**

***---विवेचन---***

**श्री. व्ही.आर. गातेकर यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. १२/११/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी केवळ जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थी यांनी दि. १३/८/२००७ च्या अर्जान्वये त्यांना कामावरुन कमी का केले याच्या अनुषंगाने माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. १३/९/२००७ च्या पत्रान्वये अपीलार्थींना असे कळविले की, अपीलार्थींनी उच्च न्यायालयात सादर केलेल्या केसवर न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर कमी करण्याची कार्यवाही आधारित असल्याने माहिती कळविण्याची आवश्यकता वाटत नाही. विचारलेली माहिती मिळाली नाही. तसेच उशीराने मिळाली असे नमूद करुन दि. १७/१०/२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २/११/२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३/९/२००७ च्या**

पत्रान्वये कळविलेल्या उत्तराला सहमती दर्शवून अपीलार्थीची मागणी नाकारली आहे. त्यामुळे व्यथित होवून अपीलार्थीनी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांची बाजू समजून घेण्यात आली. अपिलीय अधिकारी यांना सुनावणीच्या वेळेला अन्य कामगिरी सोपविली असल्याने सुनावणीसाठी हजर राहता येत नसल्याचे कळविले होते. सदर प्रकरणातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अंतरिम माहिती देण्यात आली आहे. ७ दिवसात न्यायालयीन प्रकरणाचा निकाल व माहिती उपलब्ध करुन देत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. प्राप्त परिस्थितीत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ मार्च, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/सीआर क्रमांक ३३७/०७**

**श्री. सुरेश सखाराम पाटील** **-----अपीलार्थी**
**रा. मुकटी, जि.धुळे**
**(राममंदिरच्या मागे मुकटी )**

**विरुध्द**

**१. विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी** **-----उत्तरवादी**
**विशेष जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जळगांव**
**२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**माध्यमिक आश्रमशाळा, वसंतनगर,**
**ता. परोळा, जिल्हा जळगांव.**

***---विवेचन---***

**श्री. सुरेश सखाराम पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठाकडे दि. २/११/२००७ रोजी अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये जे द्वितीय अपील केले त्या अपीलाची सुनावणी दि. ३/२/२००९ रोजी जळगांव येथे घेण्यांत आली. त्यावेळी अपीलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थी यांनी दि. १५/९/२००७ च्या अर्जान्वये वरिष्ठ वेतनश्रेणी व दुय्यम सेवा पुस्तक मिळण्याच्या अनुषंगाने खुलासेवजा माहिती मागविली होती. परंतु त्याबाबतचे अर्ज जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारले नाहीत असे नमूद करुन दि. ३/१०/२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु विहित मुदतीत आदेश/ निर्णय प्राप्त झाला नाही असे नमूद करुन दि. २/११/२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.**

**द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलार्थींनी माहिती मिळविण्याची तसेच दंडात्मक व शिस्तभंग विषयक कार्यवाहीची मागणी केली आहे. अपीलार्थींना दुय्यम सेवा पुस्तक प्राप्त झाले आहे. अपीलार्थींना वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केल्याचे व मंजूरीचे आदेश देण्यात येतील असे अधिका-यांनी सुनावणीच्या वेळेस नमूद केलेले आहे.**

अपीलार्थींनी मूळ माहिती प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात मागितली आहे. अपीलार्थींचे वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूरीचे आदेश दोन दिवसात काढण्याचे आयोगास सुनावणीच्या वेळेस सांगितले असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल याची जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी खात्री करावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारातील अर्ज जरी हाताखालील कर्मचा-यांनी दिलेला असला तरी ते स्वीकारण्यास नकार देऊ नये अशी त्यांना समज देण्यात येत आहे. कोणत्याही नागरिकाचा अर्ज स्वीकारण्यास यापुढे नकार दिल्यास त्याची आयोगाकडून गंभीर दखल घेतल्या जाईल.

(डॉ.सुरेश वि. जोशी),<br>
दिनांक. ३१ मार्च, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.